


| वर्ष - 9 | अंक -133 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

## आतील पानांत
- भारताचा आफ्रिकेविरूद्ध मालिका विजय!
- बांगलादेशचे सामने भारताबाहेर?
- खुला प्रवर्ग कुणासाठी राखीव नाही
- मी कधीच विचारधारेपासून दूर गेलो नाही

www.mahaenews.com | मंगळवार, दि. 6 जानेवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा ठाम निर्धार साहित्य संमेलनांना निधी कमी पडू देणार नाही

# मराठी भाषा म्हणजे संस्कृतीचा आत्मा!

## मराठी केवळ संवादाची नव्हे तर रोजगाराची भाषा व्हावी–एकनाथ शिंदे




| सातारा / मुंबई |
प्रतिनिधी | महाईन्यूज

**"मराठी भाषा हा आपल्या संस्कृतीचा आत्मा आहे. ती आपली अस्मिता, ओळख आणि अभिमान आहे. मराठी भाषा संपली, तर आपले अस्तित्वही संपेल, याचे भान प्रत्येकाने ठेवले पाहिजे," असे परखड आणि भावनिक वक्तव्य उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. सातारा येथे पार पडलेल्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या समारोप कार्यक्रमात ते बोलत होते. मराठी भाषेच्या विकासासाठी आणि संवर्धनासाठी शासन सर्वतोपरी मदत करेल, तसेच साहित्य संमेलनांना निधी कमी पडणार नाही, ही शासनाची जबाबदारीच असल्याची ठाम ग्वाही त्यांनी यावेळी दिली.**

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, "मराठी केवळ संवादाची भाषा न राहता ती रोजगाराची भाषा झाली पाहिजे. ज्ञान, उद्योग, तंत्रज्ञान, प्रशासन आणि नव्या माध्यमांमध्ये मराठीचा अधिकाधिक वापर व्हायला हवा. शासन त्या दृष्टीने ठोस पावले उचलत आहे." या साहित्य संमेलनासाठी शासनाने तब्बल तीन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याची माहिती देत त्यांनी पुढेही अशा साहित्यिक उपक्रमांना आर्थिक पाठबळ देण्याचा निर्धार व्यक्त केला.

### साहित्याचा महाकुंभ, विचारस्वातंत्र्याचा उत्सव

साताऱ्यात पार पडलेले हे संमेलन केवळ साहित्यिक कार्यक्रम नसून मराठी भाषेच्या समृद्ध परंपरेचा, सांस्कृतिक आत्मविश्वासाचा आणि विचारस्वातंत्र्याचा उत्सव असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी नमूद केले. "हे साहित्याचा आणि मराठी भाषेचा महाकुंभ आहे. मराठी भाषेचे सर्व प्रवाह येथे एकत्र आले आहेत. या संमेलनाला साताऱ्याच्या कंदीपेढ्याचा गोडवा आणि इथल्या लोकांच्या प्रेमाची स्ट्रॉबेरी लाभली आहे," अशा शब्दांत त्यांनी साताऱ्याच्या संस्कृतीचे कौतुक केले.

या समारोप सोहळ्याला ज्ञानपीठ पुरस्कार सन्मानित ज्येष्ठ साहित्यिक रघुवीर चौधरी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत, पालकमंत्री शंभूराज देसाई, स्वागताध्यक्ष सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, रोजगार हमी मंत्री भरत गोगावले, संमेलनाध्यक्ष विश्वास पाटील, आमदार महेश शिंदे, कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी, जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलिस अधीक्षक तुषार दोशी, नगराध्यक्ष अमोल मोहिते, मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, कार्यवाहक सुनिताराजे पवार, संमेलनाचे संरक्षक फरोख कूपर आदी मान्यवर उपस्थित होते.

### मराठीचा सन्मान, हिंदीची सक्ती नाही

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, "राज्यात हिंदी भाषेची सक्ती अजिबात होणार नाही. उलट मराठी भाषेचा सन्मान अधिकाधिक वाढविला जाईल." मराठी साहित्य सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावे यासाठी राज्यातील सर्व एसटी बस स्थानकांमध्ये मराठी ललित पुस्तकांच्या विक्रीसाठी ५० टक्के सवलतीचे स्टॉल उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची घोषणाही त्यांनी केली. तसेच लेखन आणि प्रकाशन क्षेत्रावर लागू असलेला कर कमी करण्यासाठी शासन प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी आपल्या भाषणात सांगितले की, आतापर्यंत साहित्य संमेलनाचे शंभर अध्यक्ष झाले असून, त्यांचा सन्मान ग. दि. माडगूळकर यांच्या नावाने करण्यात येणार आहे. निवृत्त अध्यक्षांना महादजी शिंदे यांच्या नावाने विशेष निधी दिला जाईल, असेही त्यांनी जाहीर केले. याचप्रमाणे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या स्मारकासाठी एमआयडीसीकडून दीड एकर जागा उपलब्ध करून दिली जाणार असल्याची घोषणाही करण्यात आली.

### साहित्यप्रेमींची मोठी गर्दी

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा शेवटचा दिवस आणि रविवारची सुट्टी असा योग आल्याने साहित्यप्रेमींना मोठी पर्वणी लाभली. लहानग्यांपासून ते ज्येष्ठ वाचकांपर्यंत सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत संमेलन परिसर गजबजून टाकला.

## शिवसेना शिंदे गटाची ताकद वाढली; उद्धव ठाकरेंना मोठा धक्का

राज्यात सध्या महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. येत्या 15 जानेवारी रोजी महापालिका निवडणुकीसाठी मतदान होणार आहे, तर 16 जानेवारी रोजी मतमोजणी होणार आहे. दरम्यान आज महापालिका निवडणुकासाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस आहे. उमदेवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी सर्वच पक्षांची डोकेदुखी चांगलीच वाढली आहे, ऐनवेळी काही उमेदवारांनी निवडणुकीतून माघार घेतल्यामुळे विरोधी पक्षाचे उमेदवार विजयी झाले आहेत. आतापर्यंत महाविकास आघाडीमधील अनेक उमेदवारांनी निवडणुकीतून माघार घेतली आहे, त्याचा थेट फायदा हा महायुतीला झाला आहे. महायुतीचे अनेक उमेदवार हे बिनविरोध निवडून आले आहेत. राजकीय वर्तुळातून मोठी बातमी समोर येत असून, शिवसेना ठाकरे गटाला मोठा धक्का बसला आहे. नागपुरात महापालिका निवडणुकीपूर्वी घडामोडींना वेग आला आहे. शिवसेना ठाकरे गटाचे प्रभाग 21 चे अधिकृत उमेदवार गौरव महाजन यांनी शेवटच्या दिवशी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे. त्यामुळे ऐन निवडणुकीच्या तोंडावर शिवसेना ठाकरे गटाला नागपुरात मोठा धक्का बसला आहे. गौरव महाजन यांनी केवळ आपला उमेदवारी अर्जच मागे घेतला नाही तर त्यांनी थेट शिवसेना शिंदे गटाचे प्रभाग क्रमांक 21 चे अधिकृत उमेदवार अजय दलाल यांना पाठिंबा दिला आहे. त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे. त्यामुळे आता शिवसेना शिंदे गटाची ताकद वाढली आहे. दरम्यान दुसरीकडे जळगावमध्ये देखील शिवसेना ठाकरे गटाला धक्का बसला आहे, उमेदवारानं ऐनवेळी माघार घेतल्यामुळे भाजपच्या उमेदवाराचा विजयी झाला आहे. अनेक ठिकाणी हीच परिस्थिती पहायला मिळत आहे, काही ठिकाणी अपक्ष उमेदवारांनी तर काही ठिकाणी महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी शेवटच्या दिवशी निवडणुकीतून माघार घेतल्यामुळे त्याचा थेट फायदा हा भाजप आणि शिवसेना शिंदे गट युतीला झाला आहे, अनेक ठिकाणी उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. आतापर्यंत महायुतीचे एकूण 57 उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. हा महाविकास आघाडीसाठी मोठा धक्का मानला जात आहे.

## वयाच्या ८२व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास | राजकीय, क्रीडा व सामाजिक क्षेत्रात ठसा उमटवणारे नेतृत्व हरपले

# माजी खासदार सुरेश कलमाडी यांचे निधन!

## दीर्घ आजाराने पुण्यात निधन

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**माजी खासदार आणि काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते सुरेश कलमाडी यांचे निधन झाले. वयाच्या ८२व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. गेल्या अनेक दिवसांपासून ते आजारी होते आणि उपचार सुरू होते. त्यांच्या निधनामुळे पुणे शहरासह राज्याच्या राजकीय, सामाजिक आणि क्रीडा क्षेत्रात शोककळा पसरली आहे.**



सुरेश कलमाडी हे पुणे लोकसभा मतदारसंघातून खासदार म्हणून निवडून आले होते. त्यांनी दीर्घकाळ राष्ट्रीय राजकारणात सक्रिय भूमिका बजावली. लोकप्रतिनिधी म्हणून काम करताना त्यांनी पुणे शहराच्या विकासासाठी विविध पायाभूत सुविधा, क्रीडा क्षेत्राचा विस्तार आणि शहरी प्रश्नांवर लक्ष केंद्रित केले. पुण्याच्या जडणघडणीत त्यांचे योगदान महत्त्वाचे मानले जाते.

राजकारणासोबतच सुरेश कलमाडी यांची ओळख क्रीडा प्रशासनातही होती. आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन, क्रीडा संघटनांमधील भूमिका आणि क्रीडाक्षेत्राच्या विकासासाठी त्यांनी केलेले प्रयत्न यामुळे ते राष्ट्रीय पातळीवर परिचित होते. त्यांच्या कार्यकाळात पुणे शहराला क्रीडा नगरी म्हणून ओळख मिळवून देण्याचे प्रयत्न झाले. सुरेश कलमाडी यांच्या कार्यशैलीत ठामपणा, प्रशासनाचा अनुभव आणि व्यापक संपर्क हे विशेष गुण होते. समर्थकांच्या मते, त्यांनी पुणे शहराला राष्ट्रीय स्तरावर वेगळी ओळख मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. तर टीकाकारांच्या मते, त्यांच्या राजकीय प्रवासात वादग्रस्त प्रसंगही आले. मात्र, तरीही राजकारण आणि सार्वजनिक जीवनात त्यांचा ठसा उमटलेला असल्याचे मानले जाते.

त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच विविध राजकीय पक्षांचे नेते, सामाजिक कार्यकर्ते, क्रीडाक्षेत्रातील मान्यवर तसेच नागरिकांनी शोकभावना व्यक्त केल्या आहेत. अनेकांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून श्रद्धांजली अर्पण केली असून, "एक अनुभवी नेता आणि सार्वजनिक जीवनातील महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व हरपले," अशा भावना व्यक्त होत आहेत. सुरेश कलमाडी यांच्या पश्चात कुटुंबीय, नातेवाईक आणि मोठा मित्रपरिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार पुण्यात करण्यात येणार असून, अंत्यदर्शनासाठी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. माजी खासदार सुरेश कलमाडी यांच्या निधनाने एक अनुभवी राजकारणी, प्रशासक आणि सार्वजनिक जीवनात सक्रिय असलेले व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. त्यांच्या कार्याची आणि योगदानाची चर्चा पुढील काळातही होत राहील, यात शंका नाही.

### पायलट ते खासदार: एक संघर्षमय प्रवास

भारतीय हवाई दलात 'पायलट' म्हणून आपल्या कारकिर्दीची सुरुवात करणाऱ्या कलमाडींनी पुढे राजकारणात मोठे स्थान मिळवले. पुण्याचे खासदार, केंद्रीय मंत्री आणि भारतीय ऑलिम्पिक असोसिएशनचे (IOA) अध्यक्ष म्हणून त्यांनी अनेक वर्षे काम पाहिले. 'पुणे फेस्टिव्हल' आणि 'पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन'च्या माध्यमातून त्यांनी पुण्याला जागतिक नकाशावर आणले.

# पुणे पालिका निवडणुकीसाठी यंत्रणा सज्ज!


## EVM मशीनची पालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी केली पाहणी

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची (LOCAL BODY ELECTIONS) रणधुमाळी सुरु आहे. मुंबई, पुणेसह 29 महापालिकांच्या निवडणूका जाहीर झाल्या असून जोरदार प्रचार सुरु आहे. येत्या 15 जानेवारी रोजी मतदान होणार असून 16 जानेवारी रोजी मतमोजणी होऊन निकाल जाहीर होणार आहे.**





यामुळे राजकीय पक्षांची जोरदार तयारी सुरु आहे पण त्याचबरोबर प्रशासनाची देखील जोरदार तयारी सुरु आहे. महानगरपालिकेच्या येणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी मतदान यंत्र तयारी व मतमोजणी व्यवस्थेची पाहणी केली आहे. आज दिनांक ५ जानेवारी२०२६ रोजी सकाळी भवानी पेठ येथील सावित्रीबाई फुले प्रशाला येथे व कसबा पेठ क्षेत्रिय कार्यालय मधील न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रोड येथील मतदान प्रक्रियेसंदर्भात महत्त्वपूर्ण पाहणी करण्यात आली. या पाहणीवेळी पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम, अतिरिक्त महापालिका आयुक्त(विशेष) ओमप्रकाश दिवटे, भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालयाचे निवडणूक निर्णय अधिकारी कल्याण पांढरे यांच्यासह उपायुक्त निवडणूक प्रसाद काटकर, उपायुक्त अरविंद माळी, उपायुक्त आशा राऊत, सहायक आयुक्त तिमया जागले, महाडिक हे उपस्थित होते. यावेळी मतदान यंत्रांची पाहणी, स्ट्रॉंग रूमची पाहणी, मतमोजणी केंद्राची पाहणी तसेच निवडणूक कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यामध्ये मतदान यंत्रांची सुरक्षितता, सीसीटीव्ही निगराणी, अग्निशमन सुविधांची उपलब्धता तपासणी, तसेच मतमोजणी केंद्रातील आवश्यक सुविधांची पाहणी करण्यात आली.

### केंद्रांमध्ये आवश्यक सुरक्षा

यावेळी मतदान यंत्रांची पाहणी करून तज्ज्ञ यांच्याशी संवाद साधला. पाहणी दरम्यान आयुक्तांनी विद्युत व्यवस्था सुरक्षित ठेवणे, स्ट्रॉंग रूम व मतमोजणी केंद्रांमध्ये आवश्यक सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करणे, तसेच मतमोजणीची प्रक्रिया नियोजित वेळेत, पारदर्शक व सुरळीत पार पडेल यासाठी आवश्यक मनुष्यबळ, तांत्रिक सुविधा व नियंत्रण कक्षांची योग्य व्यवस्था करण्याबाबत स्पष्ट सूचना दिल्या. निवडणूक प्रक्रिया शांततेत, निर्भय वातावरणात व नियमानुसार पार पडावी यासाठी सर्व संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय ठेवण्याचे निर्देश देण्यात आले.

मिशन- PCMC : विकासाभिमुख हिंदुत्वाचा विचार

# म्हणून भाजपा पुन्हाचा निर्धार!

## आमदार महेश लांडगे यांचे शहरवासीयांना आवाहन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६च्या पार्श्वभूमीवर आमदार महेश लांडगे यांनी शहरवासीयांना नवीन वर्षाच्या शुभेच्छांसह भारतीय जनता पार्टीला पाठिंबा देण्याचे आवाहन केले आहे. याबाबत त्यांनी सोशल मीडियावर सविस्तर 'व्हीडिओ' पोस्ट केला आहे. त्यामध्ये शहरातील प्रमुख विकासकामांचा आढावा घेत आगामी काळात शाश्वत विकासासाठी भाजपाला पुन्हा साथ द्या, असे भावनिक आवाहन केले आहे.**



आमदार लांडगे यांनी २०१७ पासून पिंपरी-चिंचवडमध्ये सुरू झालेल्या विकासप्रक्रियेचा उल्लेख करत मेट्रो, नदी सुधार प्रकल्प, वेस्ट-टू-एनर्जी, आयआयएम, सीओईपी, स्पोर्ट्स सिटी, ग्रीन सिटी आणि रेसिडेन्शियल कॉरिडॉर यांसारख्या प्रकल्पांची माहिती दिली. "शहरात 'देवेंद्र पर्व' सुरू झाले असून अनेक प्रकल्प मार्गी लागले आहेत. काही प्रकल्प पूर्णत्वाच्या दिशेने तर काही प्रगतीपथावर आहेत," असे त्यांनी नमूद केले.

राज्य आणि केंद्रात भाजपाचे सरकार असल्याने आगामी काळात शहरातील प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी अधिक बळ मिळेल, असा दावा त्यांनी केला. "शहरातील निर्णय शहरातच व्हावेत, या भूमिकेतून महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत," असेही पत्रकात म्हटले आहे.

नवीन वर्षाच्या निमित्ताने नागरिकांनी विकासाला मत देत भाजपाच्या अधिकृत उमेदवारांना प्रचंड बहुमताने निवडून द्यावे, असे आवाहन करत त्यांनी "एक मत शहराच्या विकासात योगदान देणारे ठरेल," असे प्रतिपादन केले. तसेच विकासाभिमुख हिंदुत्वाच्या विचाराने शहर उज्ज्वल भविष्याकडे नेण्याचा संकल्प करण्याचे आवाहन त्यांनी केले. शेवटी आमदार लांडगे यांनी नागरिकांना पुन्हा एकदा नवीन वर्षाच्या शुभेच्छा देत "आपला पक्ष—भाजपा आणि आपला उमेदवार—'कमळ'," असा संदेश दिला आहे.

### पिंपरी-चिंचवड शहरात "अबकी बार 100 पार.." चा केला संकल्प

"भाजपा सत्ताकाळात पिंपरी-चिंचवडच्या विकासाचा प्रवास हा केवळ घोषणांचा नव्हे, तर प्रत्यक्ष कामांचा आहे. मेट्रोपासून शिक्षण, पर्यावरण, क्रीडा आणि पायाभूत सुविधांपर्यंत सुरू असलेली विकासाची चक्रे ही विश्वासातून निर्माण झाली आहेत. हा विश्वास अधिक बळकट करत, शहराच्या प्रत्येक नागरिकाच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्यासाठी पुढील पाच वर्षेही समर्पित भावनेने काम करण्याचा आमचा ठाम निर्धार आहे. कारण, विकासासाठी भाजपाशिवाय पर्याय नाही आणि शहराचे उज्ज्वल भविष्य हे आपले सामूहिक ध्येय आहे."

– **महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# भाजपाकडून मीनाज इनामदार यांना उमेदवारी!

## सर्वसमावेशक हिंदुत्वाचा आदर्श; हिंदुत्ववादी आमदार महेश लांडगे यांच्या भूमिकेचे सर्वस्तरातून स्वागत

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय जनता पार्टीचे पिंपरी-चिंचवडमधील हिंदुत्ववादी आमदार महेश लांडगे आपल्या कट्टरतावादी विधानांमुळे कायम चर्चेत असतात. कुदळवाडी येथील अतिक्रमण कारवाईनंतर त्यांच्यावर मुसिलमविरोधी म्हणून टीकासुद्धा झाली. किंबहुना, लव्ह जिहाद, व्होट जिहाद, धर्मांतर, गोहत्या बंदी आणि गोवंश संवर्धन असे मुद्दे कायम केंद्रबिंदू मानणारे महेश लांडगे यांची महापालिका निवडणुकीत आश्चर्यकारक कृती समोर आली आहे.**



पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक 9 नेहरुनगर- खराळवाडी प्रभागातून मीनाज फारूख इनामदार या अवघ्या 20 वर्षांच्या मुस्लिम मुलीला उमेदवारी दिली आहे. दुसऱ्या बाजुला शाहु-फुले-आंबेडकर असा विचारांचा वारसा सांगणाऱ्या राष्ट्रवादीला मात्र, एकाही मुस्लिम उमेदवाराला संधी देता आली नाही.

याबाबत AIMIM च्या महिला प्रदेशा कार्याध्यक्षा रुहीनाज शेख यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीवर टीकेची झोड उडवली आहे. "अजितदादा पवार यांनी पिंपरी-चिंचवडमधील एकाही मुस्लिम कार्यकर्त्याला उमेदवारी दिली नाही." असा दावा केला. तसेच, आमदार महेश लांडगे यांनी आपले समर्थक फारुख इनामदार यांच्या मुलीला संधी देत "सर्वसमावेशक हिंदुत्व" चा संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे.

"आपल्या आया-बहिनींकडे वाकड्या नजरेने पाहणाऱ्याचे डोळे काढून ठेवायची ताकद ठेवा..मग, तो कोणत्याही जाती-धर्माचा असो.." अशी जाहीर भूमिका घेणारे आमदार महेश लांडगे यांच्यावर कट्टरतावादी सातत्याने आरोप करतात. पण, महेश लांडगे आपल्या समर्थक मुस्लिम कार्यकर्त्याला संधी देतात, ही बाब निश्चितच स्वागतार्ह म्हणावी लागेल.

राज्यातीलच नव्हे, तर देशासह जगभरामध्ये प्रचंड कडवट हिंदुत्ववादी नेता म्हणून ज्यांची ओळख आहे. ते दिवंगत शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी देशविघातक कृत्यांना प्रोत्साहन देणाऱ्या मुसलमानांचा कायम खरपूस समाचार घेतला. त्यांच्यावर अंतरराष्ट्रीय दर्जाच्या धमक्यासुद्धा आल्या होत्या, हे संपूर्ण महाराष्ट्राला ज्ञात आहे. मात्र, बाळासाहेबांनी आपले समर्थक साबीर शेख आणि हारुख खान यांना या दोन मुस्लिम सहकाऱ्यांना राजकीय ताकद दिली. साबीर शेख हे 1990-2000 च्या दशकात रोजगार मंत्री होते. तसेच, हारुख खान हे वर्सोवा विधानसभेचे आमदार झाले आहेत.

विधानसभा सभागृहात समाजवादी पार्टीचे आमदार अबू आझमी यांच्यावर आक्रमक हल्लाबोल करणारे आमदार महेश लांडगे, धर्मांतर, लव्ह जिहाद, व्होट जिहाद सारख्या मुद्यांवर प्रखर भाष्य करणारे नेते आहेत. मात्र, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने त्यांनी "विकासाभिमूख हिंदुत्व" अशी सर्वसमावेशक 'पॉलिटिकल लाईन' अधोरेखित केली आहे. विशेष म्हणजे, "आठरा पगड जाती, बारा बलुतेदार यांना सोबत घेवून जाणारे छत्रपती शिवाजी महाराज आणि धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांना अभिप्रेत असलेले 'हिंदुत्व' आम्ही स्वीकारले आहे." असे आमदार लांडगे सांगतात. ते महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने कृतीतून दाखवले. महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने भाजपा आणि राष्ट्रवादी अशी तुलना होईल. त्यावेळी मुस्लिम समाजबांधवांना प्रतिनिधीत्व या मुद्यावर भाजपा किंबहुना महेश लांडगे यांची भूमिका सरस ठरणार, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

### मीनाज फारुक इनामदार कोण आहेत?

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ९ ब मधून कुमारी मीनाज फारुक इनामदार या भारतीय जनता पक्षाच्या अधिकृत उमेदवार म्हणून निवडणूक लढवत आहेत. त्या सामाजिक कार्यकर्ते फारुक नादिरअली इनामदार यांची कन्या असून त्यांचे वडील गेल्या नऊ वर्षांपासून आमदार महेशदादा लांडगे यांच्या सोबत कार्यरत आहेत. आमदार महेशदादा लांडगे यांच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात फारुक इनामदार यांनी पिंपरी-चिंचवड शहर अल्पसंख्यांक मोर्चा अध्यक्षपदाची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली आहे. मीनाज इनामदार यांना कौटुंबिक पार्श्वभूमीतूनच समाजसेवा, देशभक्ती व सामाजिक जाणीवेचे संस्कार लाभले आहेत. त्यांचे आजोबा नादिरअली यासीन इनामदार हे सैन्यात कार्यरत होते तसेच कुस्ती क्षेत्राशी निगडित होते. बी.कॉम पदवीधर असलेल्या मीनाज इनामदार सध्या फायनान्स मॅनेजमेंटमध्ये पदव्युत्तर शिक्षण घेत असून प्रभागातील नागरिकांच्या समस्या सोडवून विकासकामांना गती देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

# जंगले आणि हरवलेले मानवी अस्तित्व




**शेवटी, सिमेंटची जंगले ही प्रगती नाहीत, तर मानवी अस्तित्वाच्या हरवलेल्या स्वप्नांची स्मशाने आहेत. वाढते शहरीकरण हे विकासाचे साधन असले तरी ते मानवीय मूल्यांच्या किंमतीवर नसावे. हे भयाण वास्तव ओळखून, शाश्वत मार्ग निवडण्याची वेळ आली आहे. अन्यथा, माणूस या सिमेंटच्या जंगलात हरवून जाईल, आणि निसर्गाच्या हिरव्यागार सावलीतून वंचित राहील.**

ही केवळ समस्या नाही, तर आव्हान आहे जे स्वीकारून आपण एक चांगले जग घडवू शकतो.आजच्या वेगवान जगात शहरीकरण हे प्रगतीचे प्रतीक मानले जाते. उंच इमारती, रुंद रस्ते, चकचकीत मॉल्स आणि अत्याधुनिक पायाभूत सुविधा हे सर्व विकासाच्या चित्रपटातील चमकदार दृश्ये वाटतात. पण या चकचकीत पडद्यामागे एक भयाण वास्तव लपलेले आहे सिमेंटची जंगले आणि हरवलेले मानवी अस्तित्व. वाढते शहरीकरण मानवी जीवनाला सुविधा देत असले तरी ते पर्यावरण, आरोग्य, सामाजिक बंध आणि वैयक्तिक सुख यांचा गळा घोटत आहे. हे जळजळीत वास्तव आहे शहरीकरणाच्या वेगवान प्रक्रियेमुळे शहरांचा विस्तार अनियंत्रित झाला आहे. ग्रामीण भागातून शहरांकडे येणाऱ्या लोकसंख्येच्या ओघाने जमिनीचा अतोनात वापर होत आहे. हिरवी जंगले, शेते आणि



नद्या सिमेंटच्या जंगलांनी गिळंकृत होत आहेत. पर्यावरणीय संतुलन बिघडल्याने हवामान बदलाची तीव्रता वाढली आहे. उष्णतेच्या लाटा, अतिवृष्टी आणि प्रदूषण हे शहरवासीयांचे दैनंदिन शत्रू बनले आहेत. उदाहरणार्थ, मुंबई किंवा दिल्लीसारख्या महानगरांत हवेची गुणवत्ता इतकी खराब झाली आहे की, श्वास घेणेही धोकादायक ठरते. विश्व आरोग्य संघटनेनुसार, जगातील बहुसंख्य लोक प्रदूषित हवेत श्वास घेतात, आणि याचे मुख्य कारण शहरीकरण आहे. हे केवळ शारीरिक आरोग्यावर नाही, तर मानसिक आरोग्यावरही परिणाम करते. सिमेंटच्या या जंगलात माणूस एकाकी होत चालला आहे; निसर्गाशी असलेला संबंध तुटला आहे, ज्यामुळे तणाव, नैराश्य आणि चिंता वाढत आहेत. शहरीकरणाच्या या भयाण वास्तवात सामाजिक असमानता ही आणखी एक मोठी समस्या आहे. श्रीमंतांसाठी उंच टॉवर्स आणि लक्झरी सुविधा उभ्या राहत असताना, गरीब आणि मध्यमवर्गीय लोक झोपडपट्ट्या आणि अस्वच्छ वस्त्यांत ढकलले जातात. पाणी, वीज आणि स्वच्छतेच्या मूलभूत गरजाही पूर्ण होत नाहीत.

वाढत्या लोकसंख्येमुळे वाहतूक कोंडी, अपघात आणि अपराध वाढले आहेत. शहरातील जीवन हे स्पर्धेचे युद्धक्षेत्र बनले आहे, जिथे माणूस माणसाशी जोडलेला नसतो, तर केवळ स्वत:च्या अस्तित्वासाठी धडपडतो. हरवलेले मानवी अस्तित्व याचेच प्रतीक आहे नातेसंबंध कमकुवत होत आहेत, पारंपरिक मूल्ये लुप्त होत आहेत, आणि माणूस एक यंत्रासारखा काम करत राहतो. शहरीकरणाने रोजगाराच्या संधी दिल्या खऱ्या, पण त्याबरोबरच बेरोजगारी, महागाई आणि सामाजिक तणावही वाढवले आहेत. पर्यावरणीय दृष्टिकोनातून पाहता, शहरीकरण हे पृथ्वीच्या संसाधनांचा अतोनात वापर करत आहे. जंगले तोडल्याने जैवविविधता नष्ट होत आहे, ज्यामुळे पाणीटंचाई आणि मातीची धूप वाढली आहे. शहरांतून निर्माण होणारा कचरा आणि प्लास्टिक प्रदूषण समुद्र आणि नद्यांना विषारी करत आहे. हे वास्तव भयाण आहे कारण ते केवळ वर्तमान नाही, तर भविष्यालाही धोक्यात टाकत आहे. जलवायू परिवर्तनाच्या संकटात शहरीकरणाचे योगदान मोठे आहे, आणि जर हे अनियंत्रित राहिले तर पुढच्या पिढ्या उजाड शहरांत जगण्यास भाग पडतील. मात्र, हे वास्तव बदलण्यासाठी उपाय आहेत. शाश्वत शहरीकरण हे उत्तर आहे. उद्याने वाढवणे, आणि कचरा व्यवस्थापन सुधारणे असे काही महत्त्वाची पावले उचलली पाहिजे. सरकारांनी धोरणे आखली पाहिजेत ज्यात ग्रामीण विकासावर भर देऊन शहरांकडे येणारा ओघ कमी केला जाईल. नागरिकांनीही जबाबदारी घेतली पाहिजे कमी वाहनांचा वापर, पुनर्वापर आणि निसर्ग संरक्षणात सहभाग. शिक्षण आणि जागरूकता हे शस्त्र आहेत ज्याने हे भयाण वास्तव बदलता येईल. शेवटी, सिमेंटची जंगले ही प्रगती नाहीत, तर मानवी अस्तित्वाच्या हरवलेल्या स्वप्नांची स्मशाने आहेत.

## प्रासंगिक »

### मायमराठी

***मुंबईतील मराठी माणसांचा टक्का दिवसेंदिवस कमी होत आहे.***

साताऱ्यातील साहित्य संमेलनही वादाविना पार पडलं नाही; परंतु प्रशासकीय अधिकारी असताना अनेक समस्यांवर कसा तोडगा काढायचा हे अंगवळणी पडलेल्या विश्वास पाटील यांनी 'संभाजी' या कादंबरीवरून निर्माण झालेल्या वादात काहीशी नमती भूमिका घेत त्यातून संयमी पद्धतीनं तोडगा काढला. साहित्य संमेलनाचं उद्घाटन निर्विघ्नपणे पार पडलं. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांच्या वादग्रस्त लिखाणावरून त्यांना साहित्य संमेलनालाच येऊ न देणं, त्यांना भाषण न करू देणं असा प्रकार महाबळेश्वरच्या साहित्य संमेलनात झाला होता. तसा प्रकार साताऱ्यात झाला नाही, त्याला कारण पाटील यांचा संयमीपणाच. साताऱ्याच्या तीन दशकांपूर्वीच्या साहित्य संमेलनाचं स्वागताध्यक्षपद अभयसिंह राजे भोसले यांच्याकडं होतं,वडील आणि मुलगा यांना सारस्वतांच्या दरबारात मिळालेला हा मान ही वेगळाच योगायोग. उद्घाटन समारंभात उद्घाटक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात फक्त मराठीचीच सत्ती चालेल.

आरक्षणाच्या मागणीसाठी वेगवेगळ्या समाजगटांचा सातत्याने संघर्ष सुरू आहे. पण रोजगाराची वास्तविक स्थिती, सरकारी-सार्वजनिक क्षेत्राचे आकुंचन आणि आरक्षणाच्या अपुऱ्या अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवर या मुद्द्याकडे नव्या दृष्टीने पाहण्याची वेळ आली आहे.

## आरक्षण हवे ? पण नोकऱ्या कुठे आहेत?

आरक्षणावरची चर्चा समाजात होत राहणे हे सामाजिक न्यायाची चाड असल्याचेच लक्षण आहे. मात्र ही चर्चा ठरावीक मुख्यांभोवती महणजे आरक्षणाच्या बाजूने आणि विरोधात न होता तिचा परीघ वाढला पाहिजे. आरक्षणासाठी लाखोंचे मोर्चे, सभा होत असताना, समाजामध्ये दुही निर्माण होत असताना, ते आरक्षण ज्या सरकारी नोकऱ्यांसाठी लागू आहे त्याची एकंदरीत परिस्थिती समजून घेतली पाहिजे. 'राखीव जागा अमलात आल्या त्यावेळी त्या १० वर्षांनी रद्द व्हाव्यात अशा प्रकारची तरतूद डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात केली होती.' हे विधान पूर्णपणे चुकीचे आहे. मुळात हा जाणीवपूर्वक पसरलेला गैरसमज आहे. शिक्षण आणि नोकरीतील आरक्षण (कलम १५(४), १६(४)) वर १० वर्षांची मर्यादा नाही. या तरतुदी कायमस्वरूपी आहेत. त्यामुळे किमान इथून पुढे तरी शिक्षण आणि नोकरीतील आरक्षणाबाबत चुकीचा प्रचार होऊ नये. आणि आंबेडकरांचे नाव घेऊन तर




मुळीच नको. १० वर्षांची कालमर्यादा केवळ राजकीय आरक्षणासाठी घालण्यात आली होती. पण तिलाही आंबेडकरांचा विरोध होता. राजकीय आरक्षणालाही कालमर्यादा नसावी असे त्यांचे म्हणणे होते. तडजोड म्हणून त्यांनी ती स्वीकारली. पण त्यातही १० वर्षांची कालमर्यादा घटनादुरुस्ती करून वेळोवेळी वाढवण्यात येईल अशी तरतूद करवून घेतली. आणि त्यानुसारच दर दहा वर्षांनी ती वाढवली गेली आहे. आता मुख्य मुद्दा सरकारी नोकऱ्यांचा, ज्यात आरक्षणाची तरतूद लागू आहे. यासाठी भारताची रोजगाराची परिस्थिती समजून घेतली पाहिजे. भारताची लोकसंख्या जवळपास १४५ कोटी इतकी आहे. त्यातील अंदाजे १०० कोटी लोक वर्किंग एज ग्रुप (१५ ते ६४ वर्षे) मध्ये येतात. पैकी ५५-५७ कोटी लोक कामगार शक्तीचा (लेबर फोर्स) भाग आहेत. (भारताचा LFPR-लेबर फोर्स पार्टिसिपेशन रेट ५५.४% आहे. तो जगाच्या सरासरीच्या ६१% पेक्षा कमी आहे). यापैकी सुमारे ५१-५३ कोटी लोक प्रत्यक्ष "हाताला काम" (EMPLOYED) असलेले आहेत. (खरंतर भारताच्या रोजगारीत असण्याच्या अगदी दिल्या व्याख्येमुळे हा आकडा जास्त दिसतो, वास्तविक हा आणखी कमी आहे.या सहापैकीही एक कंत्राटी तत्त्वावर आहे. तिथे आरक्षण लागू नाही. म्हणजे १०० पैकी फक्त पाच रोजगारांमध्ये घटनात्मक आरक्षण उपलब्ध आहे. बाकी ९५% क्षेत्र पूर्णपणे खुलेच आहे. या पाच टक्क्यांमध्ये निम्मा म्हणजे २.५% नोकऱ्या सामाजिकदृष्ट्या मागासवर्गासाठी आरक्षित आहेत. म्हणजे ९७.५% रोजगार खुलेच आहेत. या २.५% जागादेखील प्रामाणिकपणे भरल्या जात नाहीत. पात्र उमेदवार नाही मिळाला म्हणून जागा रिक्त ठेवली जाते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## आमचा विकासाला विरोध


## शेतकऱ्यांची रक्ताने पत्र लिहून इच्छामरणाची मागणी

# ड्रीम प्रोजेक्टविरोधात आक्रोश!

## शक्तीपीठ महामार्ग रद्द करा

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट असणाऱ्या शक्तीपीठ महामार्गाविरोधात शेतकऱ्यांचा आक्रोश पाहायला मिळाला. हिंगोली वसमत येथे या शेतकऱ्यांनी या महामार्गाला विरोध केला. याबाबत शक्तीपीठ महामार्ग विरोधी कृती समितीच्या वतीने शेतकऱ्यांच्या रक्ताने पत्र लिहून हिंगोली जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. या शेतकऱ्यांनी आम्हाला न्याय द्या नाहीतर इच्छामरण द्या अशी मागणी सरकारकडे केली आहे.**



याबाबत शेतकरी म्हणाले की, शक्तीपीठ महामार्गाबाबत सांगली, कोल्हापूर, सोलापूर येथील मार्ग बदलण्याचा प्रस्ताव सरकारने ठेवला आहे. बाकी जिल्ह्यात तो मार्ग जुन्या आराखड्याप्रमाणेच जाणार आहे. गेल्या पावणे दोन वर्षापासून आम्ही विविध आंदोलन, निवेदने, मोर्चे काढले आहेत. मात्र हिंगोली, कळंबमध्ये शेतकऱ्यांचा विरोध नाही असं सरकार म्हणते. मराठवाड्यातील शेतकऱ्यांची काय परिस्थिती आहे हे मुख्यमंत्र्यांनी पाहिले पाहिजे. हिंगोली जिल्ह्यात ऊसाचे, हळदीचे आणि केळीचे पिक घेतले जाते. कुठल्या शेतकऱ्यांना गोव्याला माल घेऊन जायचा आहे. तुम्हाला विकास करायचा असेल तर गावखेड्यातील पाणंद रस्ते तयार करा. बाजारपेठेपर्यंत जाणारे रस्ते त्यावरील खड्डे बुजवा. आमचा विकासाला विरोध नाही. परंतु शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठाला हात न लावता विकास करा अशी मागणी त्यांनी केली. तर आम्ही शिक्षित नाही, आम्ही २ वर्ष जिल्हाधिकारी असेल, प्रशासन असेल त्यांना निवेदन देतोय पण कुणाला काही फरक पडत नाही. पोलिसांना पाठवून त्रास दिला जातो. शाईने निवेदन देऊन सरकारला जाग येत नसेल तर शेतकऱ्यांनी आपल्या रक्ताने निवेदन द्यायचे ठरवले. त्यामुळे शेतकऱ्यांनी लॅबमध्ये जात रक्त काढून आणले आणि हे पत्र शासनाला लिहिले आहे अशी भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली. दरम्यान, हिंगोली जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर या संतप्त शेतकऱ्यांनी भाजपाच्या विजयाची घोषणा दिली. आम्ही भाजपा कार्यकर्ते नाही. परंतु भाजपात गेल्यावर नेते भ्रष्टाचार मुक्त होतात तसे शक्तीपीठ महामार्ग रद्द करा आम्ही भाजपात प्रवेश करतो असा उद्विग्न प्रतिक्रिया आंदोलनकारी शेतकऱ्यांनी

### आम्ही भाजपात प्रवेश करतो

करा अशी मागणी त्यांनी केली. तर आम्ही शिक्षित नाही, आम्ही २ वर्ष जिल्हाधिकारी असेल, प्रशासन असेल त्यांना निवेदन देतोय पण कुणाला काही फरक पडत नाही. पोलिसांना पाठवून त्रास दिला जातो. शाईने निवेदन देऊन सरकारला जाग येत नसेल तर शेतकऱ्यांनी आपल्या रक्ताने निवेदन द्यायचे ठरवले. त्यामुळे शेतकऱ्यांनी लॅबमध्ये जात रक्त काढून आणले आणि हे पत्र शासनाला लिहिले आहे.

दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट असणाऱ्या शक्तीपीठ महामार्गाविरोधात शेतकऱ्यांचा आक्रोश पाहायला मिळाला. हिंगोली वसमत येथे या शेतकऱ्यांनी या महामार्गाला विरोध केला. याबाबत शक्तीपीठ महामार्ग विरोधी कृती समितीच्या वतीने शेतकऱ्यांच्या रक्ताने पत्र लिहून हिंगोली जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. या शेतकऱ्यांनी आम्हाला न्याय द्या नाहीतर इच्छामरण द्या अशी मागणी सरकारकडे केली आहे.

याबाबत शेतकरी म्हणाले की, शक्तीपीठ महामार्गाबाबत सांगली, कोल्हापूर, सोलापूर येथील मार्ग बदलण्याचा प्रस्ताव सरकारने ठेवला आहे. बाकी जिल्ह्यात तो मार्ग जुन्या आराखड्याप्रमाणेच जाणार आहे. गेल्या पावणे दोन वर्षापासून आम्ही विविध आंदोलन, निवेदने, मोर्चे काढले आहेत. मात्र हिंगोली, कळंबमध्ये शेतकऱ्यांचा विरोध नाही असं सरकार म्हणते. मराठवाड्यातील शेतकऱ्यांची काय परिस्थिती आहे हे मुख्यमंत्र्यांनी पाहिले पाहिजे. हिंगोली जिल्ह्यात ऊसाचे, हळदीचे आणि केळीचे पिक घेतले जाते. कुठल्या शेतकऱ्यांना गोव्याला माल घेऊन जायचा आहे. तुम्हाला विकास करायचा असेल तर गावखेड्यातील पाणंद रस्ते तयार करा. बाजारपेठेपर्यंत जाणारे रस्ते त्यावरील खड्डे बुजवा. आमचा विकासाला विरोध नाही.

# माझी तब्येत ठीक, शुगर वाढली होती

## राणेंनी दिली माहिती, राजकीय निवृत्तीबाबतही स्पष्टच सांगितलं

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भाजप नेते तथा खासदार नारायण राणे (NARAYAN RANE) यांनी कालच आपल्या भाषणात राजकीय संन्यास घेण्याचे, राजकारणातून निवृत्त होण्याचे संकेत दिले होते. आता, वय झालंय, थांबायला हवं असे त्यांनी म्हटलं होतं.**

कालच राजकीय निवृत्तीचे संकेत दिल्यानंतर चिपळूणमधील (SINDHUDURG) कृषी महोत्सवाच्या कार्यकमावेळी माजी मुख्यमंत्री आणि खासदार नारायण राणे यांना भोवळ आल्याने सर्वांची धावपळ उडाल्याचं पाहायला मिळालं. आता, नारायण राणेंनी तब्येतीलबद्दल माहिती देत मी ठीक आहे, असे म्हटलेले. तसेच, राजकीय निवृत्तीचे संकेत कोणी दिले? मी तसं बोललो नाही असेही त्यांनी स्पष्ट केले. चिपळूणमधील कार्यक्रमात आपल्या भाषणादरम्यान अखेरच्या टप्प्यात नारायण राणेंना भोवळ आली होती, त्यांचा आवाजही बसल्याने त्यांनी भाषण आटोपतं घेतलं. चक्कर आल्यासारखे वाटत असल्याने माध्यमांशी बोलण्यास नकार दिला. तर, या कार्यक्रमाच्या ठिकाणाहून नारायण राणे थेट गेस्ट हाऊसकडे रवाना झाले. मात्र, आता त्यांनी माध्यमांना प्रतिक्रिया देत सर्वच प्रश्नांची उत्तरे दिली. आता माझी तब्येत ठीक



असल्याचंही त्यांनी सांगितलं. भाषणात बोलताना माझं ब्लड प्रेशर लो झालं होतं आणि डायबेटिस शुगर सव्वातीनशेच्या वर गेली होती. त्यामुळे, मला अस्वस्थपणा आणि चक्कर आली होती. मात्र, आता मी ठीक आहे, असेही राणेंनी सांगितले.निवृत्तीचे संकेत कोणी दिले? असे म्हणत नारायण राणेंनी यांनी राजकीय निवृत्तीच्या चर्चेवर पहिल्यांदाच प्रतिक्रिया दिली. माझं वाक्य नीट बघा.. जर मी रिझल्ट देऊ शकलो नाही तर माझ्या पदाचा उपयोग काय? निवृत्त होतो असं मी म्हटलेलं नाही, असे नारायण राणेंनी स्पष्ट केले. जर माझ्या पदाचा उपयोग जनमानसाला होत नसेल आणि होऊ देत नसतील तर पूर्णविराम देईल, असे मी म्हटल्याचं राणेंनी सांगितलं. त्यामुळे, राजकीय निवृत्तीच्या चर्चांना राणेंकडून पूर्णविराम देण्यात आला असून राजकीय निवृत्ती घेणार नसल्याचेच त्यांनी सूचवलं आहे.सिंधुदुर्गातल्या सभेत बोलताना नारायण राणे म्हणाले की, "आजही नारायण राणे रस्त्यावर भाजी घेतो. हातात अंगठ्या घालून, काळ्या काचेच्या गाड्या घेऊन काही जण येतात... पण माझ्या गाडीला काळ्या काचा नाहीत. माणुसकी हा माझा धर्म आहे. बऱ्याच जणांनी माझ्या आड येण्याचं काम केलं, त्यावर मी आज बोलणार नाही.

### निवृत्तीचे संकेत दिले नाहीत

तेव्हाही मला अडचणी आल्या, आतांही आल्या. राजकारणात कट कारस्थान केलं जातंय. त्यामुळे, आता मी ठरवलंय, घरी बसायचं. मुलांना सांगेन नांदा सौख्य भरे... चांगल्याला जोपासा.", असे राणेंनी म्हटले होते. मात्र, आता या वाक्याचा अर्थ समजावून सांगत त्यांनी निवृत्तीच्या चर्चेला पूर्णविराम दिला.

सुप्रीम कोर्टाचा निर्णय

सरकारी नोकरीत निवड मेरिटवर व्हावी

# खुला प्रवर्ग कुणासाठी राखीव नाही!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सरकारी नोकरीत चांगले गुण मिळवून पात्र ठरलेल्या एससी, एसटी, ओबीसी आणि EWS प्रवर्गातील उमेदवाराला अनारक्षित श्रेणीतून जागा मिळण्याचा अधिकार आहे. खुल्या श्रेणीतील जागा कुठल्याही खास सामाजिक वर्गासाठी नाही. या जागा सर्वांसाठी खुल्या आहेत. त्या मेरिटच्या आधारेच भरायला हव्यात असं सुप्रीम कोर्टाने स्पष्ट सांगितले आहे..**

## राखीव उमेदवारांना दुहेरी फायदे



## जागा मेरिटच्या आधारेच भरा

निवड प्रक्रिया सुरुवातीच्या टप्प्यात मेरिटच्या आधारे यादी जारी व्हायला हवी असं कोर्टाने सांगितले. सोप्या भाषेत सांगायचे झाले तर, जर आरक्षित प्रवर्गातील एखाद्या उमेदवाराला सुरुवातीच्या टप्प्यात सामान्य प्रवर्गात निश्चित केलेल्या कट ऑफपेक्षा जास्त गुण मिळाले असतील तर त्याला खुल्या यादीतून जागा मिळायला हवी.

या सुनावणीत सुप्रीम कोर्टाने स्पष्टपणे मेरिटच्या आधारे आरक्षित श्रेणीतील उमेदवाराला खुल्या प्रवर्गातून नोकरी मिळू शकते असं सांगितले आहे. निवड प्रक्रिया सुरुवातीच्या टप्प्यात मेरिटच्या आधारे यादी जारी व्हायला हवी असं कोर्टाने सांगितले. सोप्या भाषेत सांगायचे झाले तर, जर आरक्षित प्रवर्गातील एखाद्या उमेदवाराला सुरुवातीच्या टप्प्यात सामान्य प्रवर्गात निश्चित केलेल्या कट ऑफपेक्षा जास्त गुण मिळाले असतील तर त्याला खुल्या यादीतून जागा मिळायला हवी. जर पुढील निवड प्रक्रियेच्या टप्प्यात त्याला अधिक गुण मिळाले तर त्याला सामान्य कोट्यातून नोकरी मिळू शकते. जर पुढच्या टप्प्यात त्याला कमी गुण मिळाले तर त्याला पुन्हा आरक्षित प्रवर्गातून जागा मिळू शकते. न्यायमूर्ती दीपंकर दत्ता आणि ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठाने असे म्हटले आहे की, राखीव श्रेणीतील उमेदवारांना त्यांच्या श्रेणीमुळे वंचित ठेवले जाऊ नये. हे सामाजिक न्यायाच्या संकल्पनेविरुद्ध असेल. हे प्रकरण राजस्थान उच्च न्यायालय, राजस्थान जिल्हा न्यायालये आणि न्यायिक अकादमीमध्ये एकूण २,७५६ कनिष्ठ न्यायिक सहाय्यक आणि लिपिक ग्रेड-II पदांसाठी निवड प्रक्रियेशी संबंधित आहे. २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या या प्रक्रियेत दोन टप्पे होते. ३०० गुणांची लेखी परीक्षा आणि १०० गुणांची संगणक-आधारित टायपिंग चाचणी होती. मे २०२३ मध्ये लेखी परीक्षेचे निकाल जाहीर झाल्यानंतर भरती आयोगाने टायपिंग परीक्षेसाठी शॉर्टलिस्ट तयार केली. सामान्य श्रेणीसाठी कट-ऑफ सुमारे १९६ गुणांची होती तर अनेक राखीव श्रेणींसाठी कट-ऑफ खूप जास्त होता, काही प्रकरणांमध्ये २२० पेक्षा जास्त होता. यामुळे अनेक राखीव श्रेणीतील उमेदवार ज्यांनी सामान्य श्रेणीच्या कट-ऑफपेक्षा जास्त गुण मिळवले होते ते प्राथमिक निवड यादीत येऊ शकले नाहीत. त्यांच्या श्रेणीसाठी कट-ऑफ जास्त असल्याने या उमेदवारांना टायपिंग चाचणीला बसण्याची संधी नाकारण्यात आली. हे प्रकरण राजस्थान उच्च न्यायालयात पोहोचले. तेथे श्रेणीनिहाय शॉर्टलिस्टिंग चुकीचे आहे असं खंडपीठाने असा निकाल दिला. संविधानाच्या कलम १६(४) वंचित वर्गांसाठी आरक्षणाला परवानगी देते. मनमानी वर्गीकरणामुळे त्याचा उद्देशच कमकुवत होईल असं उच्च न्यायालयाने म्हटले.आता सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा आदेश कायम ठेवला आहे. राखीव श्रेणीतील उमेदवारांना दुहेरी फायदे मिळाले आहेत हा युक्तिवाद सुप्रीम कोर्टाने फेटाळून लावला. उमेदवाराला कमी पात्रता गुण किंवा वयात सूट असे फायदे मिळाले तरच आरक्षणाचा फायदा होतो. केवळ राखीव प्रवर्गाचा सदस्य असणे म्हणजे आरक्षणाचा लाभ घेणे असे मानले जाऊ शकत नाही असं न्यायालयाने म्हटले. सरकारी नोकरीत चांगले गुण मिळवून पात्र ठरलेल्या एससी, एसटी, ओबीसी आणि EWS प्रवर्गातील उमेदवाराला अनारक्षित श्रेणीतून जागा मिळण्याचा अधिकार आहे. खुल्या श्रेणीतील जागा कुठल्याही खास सामाजिक वर्गासाठी नाही. या जागा सर्वांसाठी खुल्या आहेत. त्या मेरिटच्या आधारेच भरायला .या सुनावणीत सुप्रीम कोर्टाने स्पष्टपणे मेरिटच्या आधारे आरक्षित श्रेणीतील उमेदवाराला खुल्या प्रवर्गातून नोकरी मिळू शकते असं सांगितले आहे.

# मी कधीच विचारधारेपासून दूर गेलो नाही

## माझ्या पोस्टवर वाद का होतात : काँग्रेस नेते शशी थरूर

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**काँग्रेस नेते शशी थरुर आपल्या पक्षापेक्षा वेगळी भूमिका घेतल्याने अनेकदा चर्चेत असतात. पण, आपण कधीही पक्षाच्या विचारधारेपासून दूर गेलो नसल्याचे त्यांनी आता स्पष्ट केले आहे. मी गेली 17 वर्षे पक्षात आहे आणि सहकाऱ्यांशी माझे चांगले संबंध आहेत. कोणत्याही प्रकारचा गैरसमज असू नये, असे ते म्हणाले.**




## पक्षाच्या भूमिकेशी विसंगती नाही

सहकाऱ्यांशी माझे चांगले संबंध आहेत. कोणत्याही प्रकारचा गैरसमज असू नये, असे ते म्हणाले. केरळ प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने सुलतान बाथरी येथे आयोजित 'मिशन 2026' नेतृत्व शिबिरानंतर थरुर पत्रकारांशी बोलत होते. आगामी विधानसभा निवडणुकांसाठी रणनीती ठरवण्याच्या उद्देशाने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते.

केरळ प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने सुलतान बाथरी येथे आयोजित 'मिशन 2026' नेतृत्व शिबिरानंतर थरुर पत्रकारांशी बोलत होते. आगामी विधानसभा निवडणुकांसाठी रणनीती ठरवण्याच्या उद्देशाने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते.आपल्या अलिकडील विधानांमुळे आणि लेखांमुळे पक्षाला अडचणीत टाकले गेल्याच्या आरोपांवर थरूर म्हणाले, कोण म्हणतं मी पक्षाच्या विचारधारेचे उल्लंघन केले? विविध विषयांवर मी मत व्यक्त केले आहे, मात्र बहुतेक प्रकरणांत पक्ष आणि माझी भूमिका सारखीच राहिली आहे.संसदेत मंत्र्यांना विचारलेले प्रश्न ठरावीक दिशेचे होते आणि त्यावरुन पक्षाने अस्वस्थ होण्याचे कारण नाही. वाद बहुतांश वेळा तेव्हाच निर्माण होतात, जेव्हा माध्यमे संपूर्ण मजकूर न वाचता केवळ मथळ्यांवरून निष्कर्ष काढतात. मी लोकांना विचारतो की, त्यांनी माझे लिखाण पूर्ण वाचले आहे का? बहुतांश वेळा उत्तर 'नाही' असेच असते. संपूर्ण मजकूर वाचल्यानंतरच खरा मुद्दा समजतो. काँग्रेस अध्यक्षपदाची निवडणूक लढवल्यानंतर हे मुद्दे निर्माण झाले का? या प्रश्नावर थरूर म्हणाले, काँग्रेस पक्ष लोकशाही परंपरांचे पालन करतो. मी निवडणूक लढवली आणि हरलो, मुद्दा तिथेच संपला.भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण आडवाणी यांच्या समर्थनार्थ केलेल्या टिप्पणीबाबत थरूर म्हणाले, ते त्यांच्या 98व्या वाढदिवसानिमित्त शिष्टाचाराचा भाग होता. आपल्या संस्कृतीत ज्येष्ठांचा सन्मान करायला शिकवले जाते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी कौतुक केल्याच्या आरोपांवर थरुर म्हणाले, मी केवळ एका सार्वजनिक कार्यक्रमातील वक्तव्य केले होते. माझ्या पोस्टचा पूर्ण मजकूर वाचल्यास त्यात प्रत्यक्ष कौतुक नसल्याचे स्पष्ट होईल. काँग्रेस नेते शशी थरुर आपल्या पक्षापेक्षा वेगळी भूमिका घेतल्याने अनेकदा चर्चेत असतात. पण, आपण कधीही पक्षाच्या विचारधारेपासून दूर गेलो नसल्याचे त्यांनी आता स्पष्ट केले

# शाहरुख स्टार होण्यापूर्वीची आठवण



बॉलिवूड अभिनेत्री मनीषा कोईरा(MANISHA KOIRALA)ला ही ९० च्या दशकातील सर्वात प्रसिद्ध अभिनेत्रींपैकी एक आहे. आता मात्र अभिनेत्री तिच्या एका वक्तव्यामुळे चर्चेत आली आहे. मनीषाने बॉलिवूडचा किंग शाहरुख खान(SHAH RUKH KHAN) आणि तिच्या बॉलिवूडमधील करियरच्या सुरूवातीच्या दिवसांबद्दल भाष्य केले आहे. या दोन कलाकारांनी १९९८ साली प्रदर्शित झालेल्या 'दिल से' या चित्रपटात एकत्र काम केले होते. मनीषा कोईरालाने नुकतीच पिंकविलाला मुलाखत दिली. यावेळी बोलताना अभिनेत्रीने शाहरुख स्टार बनण्याच्या अगोदर जेव्हा तो त्याची पत्नी गौरी हिच्याबरोबर माऊंट मेरी येथील अपार्टमेंटमध्ये राहात होता, तेव्हाची आठवण सांगितली आहे. मनीषाने शाहरुख बरोबरच्या मैत्रीबद्दल म्हटले ,"अभिनय क्षेत्रात आम्ही दोघेही अगदीच नवीन होतो, त्यावेळी आमची भेट झाली होती. त्यावेळी मी बऱ्याचदा शाहरुख आणि गौरी यांच्याबरोबर वेळ घालवत असे. त्याच्या फ्लॅटमध्ये चटई अंथरलेली असे आणि आम्ही सगळे त्यावर गप्पा मारत बसायचो."मनीषाने पुढे बोलताना म्हटले की, शाहरुख खान हा पहिला व्यक्ती होता ज्याने मला मुंबईत घर विकत घेण्याचा सल्ला दिला. ती म्हणाली, "आम्ही सगळे मित्र होतो आणि आमचं वय खूप कमी होतं. मी त्याच्या एक किंवा दोन वर्ष आधी मुंबईत आले होते. आमची चांगली मैत्री झाली. त्यानेच मला मुंबईमध्ये घर घेण्याचा सल्ला दिला होता, असा सल्ला देणारा तोच पहिला व्यक्ती होता. तो म्हणाला की आपण दोघेही मुंबईच्या बाहेरून आलो आहोत आणि इथं राहण्यासाठी आपल्याला जागा हवी. त्यामुळं आपलेपणा येईल. तू इथे स्थायिक होशील."

# स्वरा भास्करचे रोमँटिक फोटो

स्वरा भास्कर सध्या तिच्या प्रेग्नेंसीच्या टप्प्याचा आनंद घेत आहे. दुसरीकडे, सोमवारी अभिनेत्रीने तिच्या मॅटर्निटी फोटोशूटचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले. या फोटोंमध्ये तिचा नवरा फहाद स्वरासोबत रोमँटिक पोज देताना दिसत आहे. पोस्ट शेअर करताना स्वराने फोटो काढल्याबद्दल छायाचित्रकाराचे आणि फोटोंचा भाग असल्याबद्दल तिच्या पतीचे आभार मानले. पोस्ट शेअर करताना स्वराने लिहिले- 'कधीकधी आयुष्य अचानक तुम्हाला खूप काही देते. जीवनाच्या प्रवासात, तुम्हाला स्वतःला शोधण्याची आणि एकमेकांना आधार देण्याची संधी मिळते. माझ्या आयुष्यातील हा खास क्षण बरखा अग्रवाल यांनी सुंदरपणे टिपला आहे. पोस्टमध्ये स्वराने खुलासा केला की, तिचा पती फहाद मॅटर्निटी शूटबद्दल संकोच करत होता. म्हणाली- 'इच्छा नसतानाही मला सपोर्टिंग मॉडेलप्रमाणे साथ दिल्याबद्दल धन्यवाद.' स्वराने तिच्या इंस्टाग्राम हँडलवर 6 फोटो शेअर केले आहेत. यातील काही चित्रे कृष्णधवल आहेत, तर काही रंगीत आहेत. पहिल्या चित्रात फहाद आणि स्वरा एका सुकलेल्या झाडाच्या खोडावर बसलेले दिसत आहेत. दुस-या चित्रात, हे जोडपे रोमँटिक पोज देत आहे, स्वरा तिच्या बेबी बंपला दाखवत आहे. स्वरा भास्करने सोशल मीडियावर तिच्या गरोदरपणाची घोषणा केली होती. पती फहादसोबतचा फोटो शेअर करताना तिने एक अतिशय भावूक पोस्टही शेअर केली आहे. फोटो शेअर करताना स्वराने लिहिले- 'कधीकधी तुमची प्रत्येक इच्छा एकाच वेळी पूर्ण होते. या नवीन प्रवासात पाऊल ठेवण्यासाठी मी खूप उत्साही, आभारी आहे. फहाद आणि स्वरा यांची लव्हस्टोरी खूपच फिल्मी होती. विशेष विवाह कायदा, 1954 अंतर्गत 6 जानेवारी 2023 रोजी त्यांचे लग्न झाले. मात्र, लग्नानंतर तब्बल एक महिन्यानंतर अभिनेत्रीने ही गोष्ट अधिकृत केली. फहाद आणि स्वरा यांची पहिली भेट 2019 मध्ये एका प्रोटेस्ट दरम्यान झाली होती. स्वरा भास्कर सध्या तिच्या प्रेग्नेंसीच्या टप्प्याचा आनंद घेत आहे. दुसरीकडे, सोमवारी अभिनेत्रीने तिच्या मॅटर्निटी फोटोशूटचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले. या फोटोंमध्ये तिचा नवरा फहाद स्वरासोबत रोमँटिक पोज देताना दिसत आहे.



# मराठी अभिनेत्री लग्नबंधनात अडकणार

मराठी कलाविश्वात सध्या लगीनघाई सुरू असल्याचं पाहायला मिळत आहे. पूजा बिरारी, प्राजक्ता गायकवाड, अनुष्का पिंपुटकर या अभिनेत्रींचा लग्नसोहळा अलीकडेच थाटामाटात पार पडला. या कलाकारांपाठोपाठ आता आणखी एक अभिनेत्री लवकरच विवाहबंधनात अडकणार आहे; तिचं नाव आहे गायत्री दातार. झी मराठीच्या 'तुला पाहते रे' या मालिकेमुळे गायत्री दातार घराघरांत लोकप्रिय झाली. तिच्यासह या मालिकेत सुबोध भावेने प्रमुख भूमिका साकारली होती. प्रेक्षकांची लाडकी गायत्री आता वैयक्तिक आयुष्यात एक नवीन सुरुवात करत लवकरच लग्नबंधनात अडकणार आहे. काही दिवसांपूर्वीच "माझ्या आयुष्यात हिरोची एन्ट्री झालेली आहे" असं कॅप्शन देत गायत्रीने सोशल मीडियावर प्रेमाची कबुली दिली होती. यानंतर गायत्रीने तिच्या होणाऱ्या नवऱ्याची ओळख सुद्धा सर्व चाहत्यांना सर्वांना करून दिली होती.आता अभिनेत्रीच्या लग्नाची सुपारी फुटली असून गायत्रीच्या घरी सगळी पाहुणेमंडळी जमल्याचं तिने शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये पाहायला मिळत आहे. या व्हिडीओला गायत्रीने 'सुपारी फुटली' असं कॅप्शन दिलं आहे. अभिनेत्रीने या कार्यक्रमासाठी खास गुलाबी रंगाची साडी नेसून पारंपरिक लूक केल्याचं पाहायला मिळत आहे. गायत्रीच्या होणाऱ्या नवऱ्याचं नाव आहे श्रीकांत चवरे ( SHRIKANT CHAVARE ). श्रीकांतने इन्स्टाग्राम बायोमध्ये नमूद केल्यानुसार IIT BOMBAY मधून त्याचं शिक्षण पूर्ण झालं आहे. तो ड्रोन फोटोग्राफर आहे. श्रीकांतला ट्रॅव्हल व फोटोग्राफीची आवड आहे. काही दिवसांपूर्वीच गायत्री-श्रीकांतच्या ड्रीम प्रपोजलचा व्हिडीओ सर्वत्र व्हायरल झाला होता.



# देवदत्तच्या पत्नी लाईमलाईटपासून दूर

देवदत्त नागे मराठी इंडस्ट्रीतील लोकप्रिय अभिनेते आहेत. 'झी मराठी'वरील 'जय मल्हार' या लोकप्रिय मालिकेतून ते घराघरांत पोहोचले. आजही लोक त्यांना या मालिकेतील भूमिकेसाठी ओळखतात. त्यांच्या ऑनस्क्रीन इमेजमुळे काही लोकांमध्ये त्यांच्याप्रती आदरयुक्त भीती असते. पण, खऱ्या आयुष्यात ते एका व्यक्तीला खूप घाबरतात आणि त्या व्यक्ती आहेत, त्यांच्या पत्नी. देवदत्त नागे व त्यांच्या पत्नी कांचन नागे यांनी नुकतीच 'आम्ही सारे खवय्ये'मध्ये हजेरी लावलेली. यावेळी त्यांनी त्यांची प्रेमकहाणी आणि एकमेकांबरोबरच्या नात्याबद्दल सांगितलं आहे. यावेळी देवदत्त नागे मस्करी करत ते त्यांच्या पत्नीला घाबरतात आणि भांडण झालं की ते आधी सॉरी बोलतात असं म्हणाले.देवदत्त नागे जरी मनोरंजन विश्वात सक्रिय असले तरी त्यांच्या पत्नी मात्र या लाईमलाईटपासून खूप दूर आहेत. त्या वेगळ्या क्षेत्रात काम करतात. कांचन नागे अलिबागमध्ये शाळेत शिक्षका म्हणून काम करतात आणि देवदत्त नागे जमेल तेव्हा त्यांच्या पत्नीला शाळेत सोडायला जातात. याबद्दल त्यांनी कार्यक्रमात सांगितलं आहे.

# मिनिषा लांबा झाली शुद्ध शाकाहारी! मांसाहार सोडल्याने झाले बदल

'बचना ऐ हसीनो' फेम मिनिषा लांबा चित्रपटांपासून दूर आहे. मात्र ती सोशल मीडियावर खूप सक्रिय आहे. बिग बॉस 8 मध्ये सहभागी झालेली मिनिषा ४० वर्षांची आहे, ती निरोगी व शिस्तबद्ध आयुष्य जगते. मिनिषाने फिट राहण्यासाठी ५ वर्षांपूर्वी एक मोठा निर्णय घेतला. यानंतर तिने शरीरात झालेले बदल सांगितले आहेत. मिनिषाने एका इन्स्टाग्राम पोस्टमध्ये खुलासा केला की ती गेल्या पाच वर्षांपासून तिने मांसाहार केलेला नाही. मांसाहार सोडल्याने शरीरापेक्षा तिचे मन आणि विचार बदलले आहेत, असंही मिनिषाने नमूद केलं. मिनिषा लांबाने फक्त एका महिन्यासाठी प्रायोगिक तत्त्वावर मांसाहार सोडायचं ठरवलं होतं. एक महिना पूर्ण झाला, मग मिनिषाने तो सहा आठवड्यांपर्यंत वाढवला, नंतर दोन महिन्यांपर्यंत. अशा प्रकारे, हा प्रवास पाच वर्षांपर्यंत पोहोचला. "ही पद्धत सोपी तर होतीच, पण याने तिला मानसिकदृष्ट्या मजबूत व्हायला मदत झाली. हा प्रवास फक्त जेवणाची प्लेट बदलण्याबद्दल नव्हता, तर आपल्या मनाचं ऐकणं, अपराधीपणाची जाणीव दूर करणं मानसिक शांती मिळवणं याबद्दल होता," असं



मिनिषा लांबाने सांगितलं.

मिनिषाने मांसाहार सोडण्याचा निर्णय लगेच घेतला नव्हता, तर टप्प्याटप्प्याने त्यासंदर्भात पावलं उचलली होती. आता तो तिच्या दिनचर्येचा अविभाज्य भाग बनला आहे. कोणतीही व्यक्ती आपल्या तत्वांवर जगते, तेव्हाच खरी शांती मिळते, असं मिनिषा लांबाने नमूद केलं. मांसाहार सोडल्यानंतर काय बदल झाले, ते मिनिषाने सांगितलं.मिनिषा लांबाच्या मते, शाकाहारी झाल्यानंतर तिच्या आयुष्यात आलेला सर्वात मोठा बदल म्हणजे मानसिक शांती होय. मांसाहाराबद्दल तिच्या मनात एक अपराधीपणाची भावना होती. प्राण्यांच्या दुःखाचा विचार करून तिला अस्वस्थ वाटायचं. मांसाहार सोडण्याचा निर्णय घेताच, ती अपराधीपणाची भावना हळूहळू कमी झाली आणि तिला शांत वाटू लागलं.

## इंडियाने इतिहास घडवला

## कर्णधार वैभव सूर्यवंशीने घडवला इतिहास

# भारताचा आफ्रिकेविरूद्ध मालिका विजय!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारताच्या अंडर-१९ संघाने दक्षिण आफ्रिकेविरूद्धची वनडे मालिका २-०ने आपल्या नावे केली आहे. या मालिकेसाठी १४ वर्षीय वैभव सूर्यवंशीवर संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी होती. भारतीय संघाने दुसरा वनडे सामना ८ विकेट्सने जिंकला. मालिका विजयाबरोबरच वैभव सूर्यवंशीच्या नेतृत्त्वाखाली टीम इंडियाने इतिहास घडवला आहे.**

## सामना ८ विकेट्सने जिंकला



दक्षिण आफ्रिका अंडर-१९ संघाविरूद्ध मालिकेसाठी वैभव सूर्यवंशीला नेतृत्त्वाची जबाबदारी देण्यात आली होती. बऱ्याच काळापासून फलंदाजीत चमकदार कामगिरी करणाऱ्या वैभवने आता कर्णधार म्हणूनही एक नवा टप्पा गाठला आहे. भारताच्या मालिका विजयात वैभव सूर्यवंशीने महत्त्वाची कामगिरी केली आहे. दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर अंडर-१९ संघाचे नेतृत्व करणारा वैभव सूर्यवंशी हा मालिका जिंकणारा सर्वात तरुण कर्णधार ठरला आहे. वयाच्या अवघ्या १४ व्या वर्षी पहिल्यांदाच संघाचं नेतृत्त्व करणाऱ्या वैभवच्या नेतृत्वाखाली भारताने दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा ८ विकेट्सने (डीएलएसच्या आधारे) पराभव केला आणि अशा प्रकारे ३ सामन्यांच्या मालिकेत २-० अशी आघाडी घेतली.१९ वर्षाखालील संघाचा कर्णधार आयुष म्हात्रे आणि उपकर्णधार विहान मल्होत्राच्या दुखापतींमुळे, वैभव सूर्यवंशीची या मालिकेसाठी कर्णधार म्हणून नियुक्ती करण्यात आली. योगायोगाने, मालिकेतील दोन्ही सामन्यांमध्ये विजा चमकल्यामुळे व्यत्यय आला आणि त्यामुळे सामन्यातील षटकं देखील कमी झाली. भारताने मालिकेतील दोन्ही सामने डीएलएस पद्धतीसह जिंकले.पहिल्या सामन्यात वैभव सूर्यवंशी फलंदाजीत अपयशी ठरला होता, पण दुसऱ्या सामन्यात त्याने एकट्याने दक्षिण आफ्रिकेविरूद्ध वादळी खेळी केली. टीम इंडियासमोर विजयासाठी २४६ धावांचे लक्ष्य होते, पण वैभव सूर्यवंशीने ५० षटकांच्या या सामन्यात टी-२० स्टाईलमध्ये फलंदाजी करत पहिल्या ८ षटकांत संघाला दमदार सुरुवात करून दिली. वैभव षटकारांचा पाऊस पाडत १९ चेंडूत अर्धशतक झळकावलं. वैभवने या सामन्यात २४ चेंडूत १० षटकार व एका चौकाराच्या मदतीने ६८ धावा केल्या.वैभव बाद झाला तेव्हा भारताची धावसंख्या ९५ होती. त्यानंतर अभिज्ञान कुंडू (नाबाद ४८) आणि वेदांत त्रिवेदी (नाबाद ३१) यांनी संघाचा डाव सावरला. मात्र, विजांच्या कडकडाटामुळे सामना दोनदा थांबवण्यात आला. परिणामी, डकवर्थ-लुईस (डीएलएस) नियमानुसार भारतासमोर २७ षटकांत १७४ धावांचे लक्ष्य ठेवण्यात आले. अभिज्ञान आणि वेदांत यांनी २४ व्या षटकात भारताला सामना जिंकून देत मालिका विजय मिळवला. भारताच्या अंडर-१९ संघाने दक्षिण आफ्रिकेविरूद्धची वनडे मालिका २-०ने आपल्या नावे केली आहे. या मालिकेसाठी १४ वर्षीय वैभव सूर्यवंशीवर संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी होती. भारतीय संघाने दुसरा वनडे सामना ८ विकेट्सने जिंकला. मालिका विजयाबरोबरच वैभव सूर्यवंशीच्या नेतृत्त्वाखाली टीम इंडियाने इतिहास घडवला आहे. दक्षिण आफ्रिका अंडर-१९ संघाविरूद्ध मालिकेसाठी वैभव सूर्यवंशीला नेतृत्वाची जबाबदारी देण्यात आली होती. बऱ्याच काळापासून फलंदाजीत चमकदार कामगिरी करणाऱ्या वैभवने आता कर्णधार म्हणूनही एक नवा टप्पा गाठला आहे. भारताच्या मालिका विजयात वैभव सूर्यवंशीने महत्त्वाची कामगिरी केली आहे. दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर अंडर-१९ संघाचे नेतृत्व करणारा वैभव सूर्यवंशी हा मालिका जिंकणारा सर्वात तरुण कर्णधार ठरला आहे. वयाच्या अवघ्या १४ व्या वर्षी पहिल्यांदाच संघाचं नेतृत्त्व करणाऱ्या वैभवच्या नेतृत्वाखाली भारताने दुसऱ्या एकदिवसीय सामन्यातसामन्यांच्या मालिकेत २-० अशी आघाडी घेतली.१९ वर्षाखालील संघाचा कर्णधार आयुष म्हात्रे आणि उपकर्णधार विहान मल्होत्राच्या दुखापतींमुळे, वैभव सूर्यवंशीची या मालिकेसाठी कर्णधार म्हणून नियुक्ती करण्यात आली.

### सूर्यवंशीने ६८ धावा केल्या

चमकल्यामुळे व्यत्यय आला आणि त्यामुळे सामन्यातील षटकं देखील कमी झाली. भारताने मालिकेतील दोन्ही सामने डीएलएस पद्धतीसह जिंकले.पहिल्या सामन्यात वैभव सूर्यवंशी फलंदाजीत अपयशी ठरला होता, पण दुसऱ्या सामन्यात त्याने एकट्याने दक्षिण आफ्रिकेविरूद्ध वादळी खेळी केली. टीम इंडियासमोर विजयासाठी २४६ धावांचे लक्ष्य होते, पण वैभव सूर्यवंशीने ५० षटकांच्या या सामन्यात टी-२० स्टाईलमध्ये फलंदाजी करत पहिल्या ८ षटकांत संघाला दमदार सुरुवात करून दिली.

# बांगलादेशचे सामने भारताबाहेर?

## सुरक्षेच्या कारणास्तव श्रीलंकेत खेळविण्याची 'आयसीसी'कडे विनंती

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि बांगलादेश यांच्यातील संबंध अधिकच चिघळण्याची चिन्हे आहेत. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) सूचनेनंतर 'आयपीएल' संघ कोलकाता नाइट रायडर्सने बांगलादेशचा वेगवान गोलंदाज मुस्तफिझूर रहमानला संघातून मुक्त केले होते.**



याची गंभीर दखल घेताना बांगलादेशातील क्रीडा मंत्रालयाने आपल्या क्रिकेट मंडळाला आगामी ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी राष्ट्रीय संघाला भारतात न पाठविण्याचे स्पष्ट आदेश दिले. त्यानुसार, आता विश्वचषकातील आमच्या संघाचे सामने भारताऐवजी श्रीलंकेत खेळविण्यात यावेत अशी विनंती बांगलादेश क्रिकेट मंडळाने (बीसीबी) आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडे (आयसीसी) केली आहे. यासाठी त्यांनी सुरक्षेचे कारण पुढे केले आहे.

'ने मुस्तफिझूरला लीगमधून दूर करण्याचे कारण स्पष्ट केले नाही. परंतु काही दिवसांपासून बांगलादेशात हिंदू धर्मीयांच्या हत्या होत असल्याने भारतातील काही राजकीय पक्षांनी दडपण आणल्याने 'बीसीसीआय'ने हे पाऊल उचलल्याची चर्चा आहे.

अभिनेता शाहरुख खानची सहमालकी असलेल्या कोलकाता नाइट रायडर्सने मुस्तफिझूरला संघमुक्त केल्यानंतर बांगलादेश क्रिकेट मंडळाची (बीसीबी) शनिवारी तातडीची बैठक बोलविण्यात आली. त्यानंतर रविवारी संचालक मंडळाची पुन्हा बैठक झाली आणि ७ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या ट्वेन्टी-२० विश्वचषकासाठी बांगलादेश संघ भारतात जाणार नाही, असा त्यात निर्णय घेण्यात आला.

### सुरक्षिततेबाबत वाढती चिंता

बांगलादेश संघाच्या सहभागाशी संबंधित एकूण परिस्थितीबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली. परिस्थितीचे सखोल मूल्यांकन केल्यानंतर आणि भारतात बांगलादेश संघाच्या सुरक्षिततेबाबत वाढती चिंता लक्षात घेऊन, तसेच बांगलादेश सरकारचा सल्ला विचारात घेऊन, सध्याच्या परिस्थितीत बांगलादेश क्रिकेट संघ या स्पर्धेसाठी भारतात प्रवास करणार नाही असे संचालक मंडळाने ठरवले आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। मंगळवार ।
दि. 6 जानेवारी 2026
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## पिंपरी-चिंचवड महानगर पालिका निवडणूक 2025-26

# "विजयाचा शंखनाद... पिंपरीत भाजपचाच कौल!"!

## प्रभाग क्र.21 मध्ये मतदारांच्या गाठीभेटींना उत्स्फूर्त प्रतिसाद

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी गाव वैभव नगर अशोक थिएटर प्रभाग क्र.२१ मध्ये भारतीय जनता पार्टीच्या प्रचाराने अक्षरशः वादळ उठवले असून, उमेदवारांना मतदारांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. भारतीय जनता पार्टी आणि आरपीआय आठवले पक्षाचे अधिकृत उमेदवार सौ. उषाताई संजोग वाघेरे, सौ. मोनिकाताई सुरेश निकाळजे, श्री. गणेश ढाकणे, श्री. नरेश पंजाबी यांनी पिंपरी कॅम्प, आयप्पा मंदिर परिसर, दुर्गा माता मंदिर परिसर, व वैष्णवी देवी मंदिर परिसरातील मतदारांच्या गाठीभेटी घेत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.**



पिंपरीतील प्रभागांमध्ये भारतीय जनता पार्टीच्या प्रचाराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, सर्वत्र विजयाचा सूर ऐकू येत आहे. प्रचाराच्या निमित्ताने भाजप उमेदवारांनी प्रभागातील पिंपरी कॅम्प, आयप्पा मंदिर परिसर, दुर्गा माता मंदिर परिसर, व वैष्णवी देवी मंदिर परिसरातील नागरिकांच्या घरोघरी जाऊन थेट संवाद साधला. या संवादातून नागरिकांच्या दैनंदिन अडचणी, त्यांच्या अपेक्षा तसेच प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या गरजा समजून घेतल्या.

प्रत्येक घरभेटीतून नागरिकांनी दाखवलेला विश्वास, आपुलकी आणि प्रेम हे भाजपच्या चारही उमेदवारांना मोठे बळ देणारे ठरत आहे. नागरिकांनी दिलेले आशीर्वाद, प्रोत्साहन आणि भक्कम पाठबळ यामुळे प्रभागाच्या विकासासाठी अधिक जबाबदारीने, प्रामाणिकपणे आणि जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळत असल्याचे उमेदवारांनी यावेळी सांगितले.

जनसंवादातून तयार होणारा हा सकारात्मक विश्वास येणाऱ्या काळात विकासाच्या नव्या वाटा उघडणारा ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. प्रभागातील प्रत्येक नागरिकाशी नाते अधिक दृढ करत, सर्वांना सोबत घेऊन प्रगती व विकासाचा मार्ग पुढे नेण्याचा संकल्प यावेळी भाजपा उमेदवार सौ उषाताई संजोग वाघेरे यांनी व्यक्त केला.

## कॅप्टन ऋतुराज कदम यांची एनसीसी कॅडेट म्हणून निवड

## प्रजासत्ताक दिन शिबिरासाठी डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला बहुमान

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**आरडीसी हे नॅशनल कॅडेट कॉर्प्स अंतर्गत आयोजित होणारे सर्वोच्च राष्ट्रीय स्तरावरील शिबिर असून ते जानेवारी २०२६ मध्ये नवी दिल्ली येथील कॅरिअप्पा परेड मैदानावर आयोजित करण्यात येणार आहे २६ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या प्रजासत्ताक दिन परेडमध्ये सहभाग हा या शिबिराचा प्रमुख टप्पा असतो.**

कठोर व बहुस्तरीय निवड प्रक्रियेतून निवड झालेल्या कॅडेट कॅप्टन रुतुराज कदम यांनी उत्कृष्ट शिस्त नेतृत्वगुण शारीरिक क्षमता तसेच



राष्ट्रीय सेवेप्रती निष्ठा सिद्ध केली आहे

या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयाचे ट्रस्टी तेजस पाटील यांनी अभिनंदन करून त्यांच्या मेहनतीचे कौतुक केले कॅम्पस डायरेक्टर ॲडमिरल अमित विक्रम निवृत्त यांनीही या यशाबद्दल शुभेच्छा देत महाविद्यालयाचा गौरव वाढविल्याबद्दल अभिनंदन केले. प्राचार्या डॉ. पी मालती यांनी कॅडेट कॅप्टन रुतुराज कदम यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या तसेच डीन प्रशासन डॉ एस एस सरनोबत डीन विद्यार्थी कल्याण डॉ स्मिता पाटसकर आणि रजिस्ट्रार प्रशांत भालेराव यांनीही अभिनंदन करून एनसीसी क्षेत्रातील यशाचे महत्त्व अधोरेखित केले

एनसीसी सी टी ओ डॉ विनोद हिवसे यांनी कॅडेटला योग्य मार्गदर्शन केले असून भविष्यातही रुतुराज कदम राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर एनसीसी क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करतील असा विश्वास व्यक्त केला..डॉ डी वाय पाटील प्रतिष्ठान संचलित डी वाय पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या वतीने कॅडेट कॅप्टन रुतुराज कदम यांना पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

## पार्लमेंट ते पालिका एकाच विचाराची सत्ता असेल,

# तर विकासकामांना गती!

### मिशन–PCMC : भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांची भूमिका

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आगामी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर 'मिशन–PCMC' अंतर्गत भाजपकडून प्रचाराला वेग आला असून, पार्लमेंटपासून ते महानगरपालिकेपर्यंत एकाच विचारांची सत्ता असेल, तर शहराच्या विकासकामांना निश्चितच गती मिळते, असे प्रतिपादन भाजपा पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष शत्रुघ्न उर्फ बापू काटे यांनी केले.**




" पिंपळे सौदागर-रहाटणी प्रभाग क्रमांक २८ सह पिंपरी-चिंचवड शहराचा सर्वांगीण आणि संतुलित विकास हाच आमचा अजेंडा आहे. नागरिकांचा आमच्यावर विश्वास आहे, प्रत्येक समस्या ऐकून घेऊन ती मार्गी लावण्यासाठी आम्ही प्रशासनाशी समन्वय साधत सातत्याने काम करीत आहोत, विकास हा शब्द नुसता घोषणापुरता न ठेवता तो प्रत्यक्षात दिसेल, याची जबाबदारी आम्ही घेतली आहे. त्यामुळे भाजपाचा विजय निश्चित आहे. **–शत्रुघ्न काटे,** शहराध्यक्ष, उमदेवार, भाजपा, प्रभाग- 28.

प्रभाग क्रमांक २८ मध्ये भाजपा–आरपीआय (आठवले गट) युतीचे अधिकृत उमेदवार शहराध्यक्ष शत्रुघ्न उर्फ बापू काटे, संदेश काटे, अनिता संदीप काटे आणि कुंदाताई संजय भिसे हे चौघेही निवडणूक रिंगणात असून, संपूर्ण प्रभागात भाजपमय वातावरण निर्माण झाले आहे. प्रचाराच्या माध्यमातून आजवर झालेल्या विकासकामांचा लेखाजोखा मांडत उमेदवार मतदारांशी थेट संवाद साधत आहेत. ागर परिसरातील विविध सोसायट्यांना दिलेल्या भेटीदरम्यान उमेदवारांनी नागरिकांच्या पाणीपुरवठा, खराब रस्ते, वाहतूक कोंडी, ड्रेनेज, कचरा व्यवस्थापन, उद्यानांची देखभाल आदी समस्यांवर चर्चा केली. प्रत्येक प्रश्न महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा करून मार्गी लावण्याची ग्वाही यावेळी देण्यात आली. निवडणूक काळापुरते राजकारण न करता सातत्याने नागरिकांच्या संपर्कात राहून काम करणारी ही टीम असल्याचा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला. महिलांपासून ज्येष्ठ नागरिक व युवकांचा या संवादात उत्स्फूर्त सहभाग दिसून आला.

## प्रभाग क्रमांक ८ मध्ये भाजपच्या अधिकृत सर्व उमेदवारांना मतदान करा!

### मिशन–PCMC: प्रचारफेरीत अभिषेक मडिगेरी यांचे मतदारांना आवाहन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक ८ मध्ये तांत्रिक कारणास्तव राहिलेल्या अपक्ष अर्जाबाबत मतदारांनी गैरसमज करू नये. प्रभाग क्रमांक ८ मधील भाजपचे अधिकृत सुशिक्षित सर्व उमेदवार विलास मडिगेरी, डॉ. सुहास कांबळे, नम्रता लोंढे, निलम लांडगे यांनाच मतदान करावे असे आवाहन प्रचारफेरीत सहभागी होत अभिषेक मडिगेरी यांनी केले.**



महापालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक ८ (ड) इंद्रायणीनगर, बालाजीनगर, संतनगर या प्रभागातून भारतीय जनता पक्षाचे अधिकृत उमेदवार विलास मडिगेरी यांच्याबरोबर त्याचे पुत्र अभिषेक मडिगेरी यांचा डमी उमेदवारी अर्ज तांत्रिक कारणाने अपक्ष म्हणून राहिलेला आहे. याबाबत सोमवारी (५ जानेवारी) काढलेल्या सेक्टर ७ मधील विविध सोसायटी मध्ये घर TO घर प्रचारफेरीतून प्रभागातील मतदारांनी कोणताही गैरसमज न करता भाजपच्या अधिकृत उमेदवारांना मतदान करावे, असे आवाहन त्यांनी केले आहे. अभिषेक मडिगेरी यांनी अधिकृत उमेदवार विलास मडिगेरी, डॉ. सुहास कांबळे, नम्रता लोंढे, निलम लांडगे यांच्यासह प्रचार फेरीत सहभागी होत सर्वांना हे आवाहन केले. या संदर्भात अभिषेक विलास मडिगेरी यांनी स्पष्टीकरण देत मतदारांना आवाहन केले आहे की, माझे वडिल विलास हनुमंतराव मडिगेरी प्रभाग क्रमांक ८ (ड) जागेवर भारतीय जनता पक्षाचे अधिकृत उमेदवार म्हणून विलास मडिगेरी निवडणूक लढवत आहेत. त्यांच्या उमेदवारी अर्जासोबत माझा डमी उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला होता. यापूर्वीच्या नियमानुसार डमी अर्ज निवडणूक आयोगामार्फत आपोआप माघार केला जात होता असा माझा समज होता. परंतु, तसे झाले नसल्याचे लक्षात येताच मी माघार घेण्याकरिता निवडणूक कार्यालयात पोहोचलो. मात्र, काही मिनिटे उशीर झाल्याने हा अर्ज माघार घेता न आल्याने प्रभाग क्रमांक ८ (ड) या जागेसाठी अपक्ष उमेदवार म्हणून घोषित करण्यात आले. तरी, मी प्रत्यक्ष ही निवडणूक लढवित नसून माझे वडिल विलास हनुमंतराव मडिगेरी हेच पक्षाचे अधिकृत उमेदवार आहेत.

मतदारांनी कोणताही गैरसमज करून न घेता भारतीय जनता पक्षाच्या चारही अधिकृत उमेदवारांना मतदान करून विजयी करावे, असे आवाहन अभिषेक मडिगेरी यांनी केले आहे.

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025–26

# इंद्रायणीनगर-भोसरी प्रभाग 8 मध्ये 'राष्ट्रवादी'चा झंझावात!

## मिशन- PCMC : तुषार सहाणे यांचे शक्तीप्रदर्शन; प्रचाराला दणक्यात सुरुवात




। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**: पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५–२६ च्या रणधुमाळीला आता खऱ्या अर्थाने वेग आला असून, प्रभाग क्रमांक ८ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने (अजित पवार गट) जोरदार शक्तीप्रदर्शन करत आपल्या प्रचाराचा श्रीगणेशा केला. शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून प्रचाराची अधिकृत सुरुवात करण्यात आली.**

प्रचाराच्या पहिल्याच दिवशी बालाजीनगर, खंडेवस्ती आणि सेक्टर १२ (PMRDA) परिसरात उमेदवारांनी भव्य रॅली काढत आपली ताकद दाखवून दिली. या रॅलीत तरुणांचा उत्साह लक्षवेधी ठरला. विशेष म्हणजे, भर उन्हातही महिला व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होत आपल्या लाडक्या नेत्यांना पाठिंबा देताना दिसले. 'अजित भाऊंचे शिलेदार' अशी ओळख असलेल्या उमेदवारांना पाहण्यासाठी ठिकठिकाणी नागरिकांची गर्दी उसळली होती.

### विकासकामांची पावती, जनतेचा विश्वास दृढ

प्रचारादरम्यान सोसायट्यांमध्ये आणि प्रभागाच्या कानाकोपऱ्यात करण्यात आलेल्या विकासकामांची पावती जनतेकडून मिळत असल्याचे चित्र होते. "आजवर केलेल्या विकासकामांची दखल जनतेने घेतली आहे. मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता विजय निश्चित असल्याचा विश्वास वाटतो," असे मत उमेदवारांनी व्यक्त केले. यावेळी अनेक नागरिकांनीही "जनता सदैव तुमच्या पाठीशी आहे," अशा शब्दांत आपला पाठिंबा दर्शविला.

### 'घड्याळ' चिन्हाला साथ देण्याचे आवाहन

प्रचारादरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची 'घड्याळ' ही निवडणूक निशाणी घरोघरी पोहोचवण्यात येत आहे. "प्रभागाचा कायापालट करण्यासाठी आणि रखडलेली कामे पूर्ण करण्यासाठी 'घड्याळ' या चिन्हासमोरील बटण दाबून चारही उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करा," असे आवाहन करण्यात आले. आपल्या प्रभागातील चारही शिलेदार महानगरपालिकेच्या सभागृहात ताकदीने पाठवण्याचा निर्धार मतदारांनी व्यक्त केला.

---

# विद्यार्थ्यांनी रक्तदानातून जपला आदर्श !

## प्रतिभा महाविद्यालयात 185 जणांचे रक्तदान, 245 जणांची आरोग्य तपासणी



। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**चिंचवड येथील कमला एज्युकेशन सोसायटी संचलित प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट मधील अध्यापक , शिक्षकेत्तर कर्मचारी , विद्यार्थीनी रक्तदान तसेच आरोग्य तपासणी शिबिरात उस्फूर्तपणे सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी केला. संस्थेच्या खजिनदार डॉ भूपाली शहा यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या आरोग्य समितीच्या वतीने हा उपक्रम प्रतिभा महाविद्यालयात राबविण्यात आला.**

भोसरी येथील रेड प्लस ब्लड बॅंकेचे डॉ इंदर जैस्वाल , प्रवर्तक डॉ . पी के शिंदे , डॉ मुजम्मील उस्मानी, सपना शिंदे , डॉ सेजल आदीनी रक्त , मधूमेह , सी. बी. सी ., तोंडाचे कॅन्सर , थायरॉईड, ईसीजी , रक्तगट तपासणी केली. त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. रक्तदान करणाऱ्या प्रत्येकाला प्रशस्तीपत्रक उपस्थित मान्यवराच्या हस्ते प्रदान करण्यात आली . या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट चे सर्व विभाग प्रमुख , कार्यक्रम समन्वयक, अध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी, तसेच स्वयंसेवकांचे मौल्यवान अनमोल सहकार्य लाभले.

कमला एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक सचिव डॉ दीपक शहा, डॉ भूपाली शहा, संचालिका डॉ तेजल शहा यानी आरोग्य समिती समवेत प्रभारी प्राचार्या डॉ क्षितिजा गांधी, उपप्राचार्या डॉ जयश्री मुळे, मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरिया समवेत आरोग्य तपासणी शिबिराला यशस्वी करण्यासाठी सहभागी झालेल्या व सहकार्य केलेल्या प्रत्येकाचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले . तुमची उपस्थिती व प्रोत्साहन आमच्यासाठी अत्यंत महत्त्वाचे होते, आणि इतका उत्तम प्रतिसाद मिळाल्याचा आम्हाला विशेष आनंद आहे अशा शब्दात संस्थेचे सचिव डॉ दीपक शहा यानी कौतुक करुन ते पुढे म्हणाले , तूम्ही सर्व जण आपल्या आरोग्याला व कल्याणाला प्राधान्य दिल्याबद्दल तूमचे प्रत्येकाचे धन्यवाद मानतो .

विभाग प्रमुख डॉ श्रुती गणपुले , उपप्राचार्या व समन्वयीका डॉ. जयश्री मुळे, प्रभारी प्राचार्या डॉ. क्षितिजा गांधी , मुख्य संयोजीका डॉ. चारुशिला पाटील, आरोग्य समिती प्रमुख व एन.एस.एस चे कार्यक्रम अधिकारी प्रा सुकलाल कुंभार आणि प्रा सुप्रिया गायकवाड यांनी विशेष परीश्रम घेतले .

## मिशन- PCMC: 'अजितदादांचे स्वप्न' पूर्ण करण्यासाठी जनतेचा कौल

# प्रभाग 5 मध्ये राष्ट्रवादीचा काँगेसचा प्रचाराची आघाडी

## उमेदवारांना सोसायट्या आणि वस्त्यांमधून अभूतपूर्व प्रतिसाद

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीच्या रणांगणात प्रभाग क्रमांक ५ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने (अजित पवार गट) जोरदार मुसंडी मारत आपली ताकद दाखवून दिली आहे. शहराध्यक्ष अजितभाऊ गव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या चारही उमेदवारांना सोसायट्या आणि वस्त्यांमधून अभूतपूर्व प्रतिसाद मिळत असून, संपूर्ण प्रभागात 'घड्याळा'चा गजर घुमू लागला आहे.**



सकाळी अजितभाऊ गव्हाणे यांच्या जनसंपर्क कार्यालयापासून भव्य पदयात्रेचा प्रारंभ झाला. तुकडोजी महाराज सोसायटी, सत्यनारायण सोसायटी, श्रीकृष्ण सोसायटी, संत ज्ञानेश्वर सोसायटी, गुरुकृपा कॉलनी, नूर मोहल्ला तसेच राष्ट्रप्रेम नगर या भागांत उमेदवारांनी घरोघरी जाऊन मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या. अनेक ठिकाणी महिलांनी उमेदवारांचे औक्षण करत विजयासाठी शुभेच्छा दिल्या.

आजवर केलेल्या विकासकामांची पावती जनतेकडून मिळत असल्याचे चित्र दिसून आले. "केलेली कामे आणि दांडगा जनसंपर्क" याच जोरावर नागरिक स्वतःहून प्रचारात सहभागी होत असल्याचे दिसून येत होते. काही ठिकाणी नागरिकांनी उमेदवारांचे कौतुक करत आपला ठाम पाठिंबा जाहीर केला. या प्रचारफेरीचे वैशिष्ट्य म्हणजे तरुणांचा उत्स्फूर्त सहभाग. अजितभाऊंच्या शिलेदारांना साथ देण्यासाठी तरुण वर्ग मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरला होता. त्याचबरोबर ज्येष्ठ नागरिकांनीही "आमचा पाठिंबा सदैव तुमच्या पाठीशी आहे," असे सांगत उमेदवारांना आशीर्वाद दिले.

### 'अजितदादांचे स्वप्न' पूर्ण करण्याचा निर्धार

अजितदादा पवार यांनी पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासासाठी पाहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व उमेदवारांना महापालिकेत ताकदीने पाठवण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. "प्रभागाचा कायापालट करणारी विकासकामे आम्ही केली आहेत. हे व्हिजन पुढे नेण्यासाठी आणि अजितदादांच्या नेतृत्वाखाली शहराचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी 'घड्याळ' या चिन्हासमोरील बटण दाबून आम्हाला विजयी करा," असा निर्धार उमेदवारांनी व्यक्त केला.

### 'घड्याळ' चिन्हाला साथ देण्याचे आवाहन

प्रचारादरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची 'घड्याळ' ही निवडणूक निशाणी घरोघरी पोहोचवण्यात येत आहे. "प्रभागाचा कायापालट करण्यासाठी आणि रखडलेली कामे पूर्ण करण्यासाठी 'घड्याळ' या चिन्हासमोरील बटण दाबून चारही उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करा," असे आवाहन करण्यात आले. आपल्या प्रभागातील चारही शिलेदार महानगरपालिकेच्या सभागृहात ताकदीने पाठवण्याचा निर्धार मतदारांनी व्यक्त केला.

# मिशन-PCMC: मोशी प्रभागात आमदार महेशदादा लांडगे यांची भव्य पदयात्रा

## माजी महापौर राहुल जाधव यांच्या नेतृत्त्वात भाजपाच्या पॅनेलचा प्रचार आघाडीवर!

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हिंदुत्ववादी आमदार महेशदादा लांडगे यांच्या नेतृत्वाखाली मंगळवार, दि. 6 जानेवारी 2026 रोजी सायंकाळी 4 वाजता भव्य पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ही पदयात्रा वूड्सविले फेज टू, लक्ष्मी चौक येथून सुरू होऊन स्वराज रेसिडेन्सी ते प्रेस्टिंग ग्रीन सोसायटी फेज 1, 2 व 3 मार्गे स्वदेशा सोसायटी, श्रीरामचौक व रिव्हर परिसरातून मार्गक्रमण करणार आहे.**




प्रभाग क्रमांक 2 अंतर्गत येणाऱ्या मोशी, बोऱ्हाडेवाडी, जाधववाडी व चिखली परिसरात ही पदयात्रा काढण्यात येणार असून नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद अपेक्षित आहे. भारतीय जनता पार्टीकडून या प्रभागात सुजाता निलेश बोराटे (अ – ओबीसी महिला), सारिका नितिन बोऱ्हाडे (ब – सर्वसाधारण महिला), राहुल गुलाब जाधव (क – सर्वसाधारण) आणि निखिल शिवाजी बोऱ्हाडे (ड – सर्वसाधारण) हे उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. पदयात्रेदरम्यान प्रभागाच्या विकासाचा आढावा घेत "प्रभाग क्रमांक 2 मध्ये आता फक्त कमळच" तसेच "प्रभाग 2 च्या प्रगतीला चारही मते भाजपला" अशा घोषणा देण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली. 'कमळ' या निवडणूक चिन्हासमोरील बटन दाबून भाजपच्या सर्व उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन यावेळी करण्यात येणार आहे.

> "प्रभाग क्रमांक २ मधील मोशी, बोऱ्हाडेवाडी, जाधववाडी आणि चिखली परिसराचा सर्वांगीण विकास हेच आमच्या पॅनेलचे प्रमुख ध्येय आहे. पाणीपुरवठा, रस्ते, ड्रेनेज, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, महिला व युवक सक्षमीकरण यांसह मूलभूत सुविधांना सर्वोच्च प्राधान्य देत पारदर्शक, लोकाभिमुख आणि गतिमान कारभार करण्याचा आम्ही ठाम निर्धार केला आहे. नागरिकांच्या प्रत्येक समस्या ऐकून वेळेत आणि गुणवत्तापूर्ण उपाययोजना राबवणे, विकासकामांमध्ये कोणताही भेदभाव न ठेवता सर्व घटकांना न्याय देणे आणि प्रभागाला आदर्श बनवणे हेच आमचे वचन आहे. 'चारही मते भाजपला' देऊन आमच्या पॅनेलला संधी दिल्यास, प्रभाग क्रमांक २ मध्ये विकासाचा नवा अध्याय निश्चितच सुरू होईल.
> **–राहुल जाधव,** माजी महापौर, उमेदवार, भाजपा, प्रभाग- 2 मोशी.

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा धुरळा

# नवी सांगवी प्रभाग क्रमांक 31 'धनुष्यबाणाची' गर्जना!

## महिला सक्षमीकरण आणि विकासाच्या मुद्द्यावर शिवसेनेचा जोर

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा धुरळा उडाला असून, प्रभाग क्रमांक ३१ मध्ये शिवसेनेच्या (धनुष्यबाण) उमेदवारांनी प्रचारात मोठी आघाडी घेतली आहे. "नवी सांगवीचा एकच निर्धार, नवी सांगवीचाच उमेदवार" अशी घोषणा देत शिवसेनेच्या उमेदवारांनी प्रभागात जनसंपर्क मोहिमेचा धडाका लावला आहे. या मोहिमेला ठिकठिकाणी नागरिकांचा, विशेषतः महिला आणि तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.**




महिलांच्या रोजगारावर विशेष भर प्रचारात महिला उमेदवारांच्या भूमिकेने विशेष लक्ष वेधून घेतले आहे. यावेळी बोलताना महिला उमेदवार मनिषा आश्विन खुडे आणि आरती संभाजी भेगडे यांनी महिलांच्या समस्यांचे निराकरण करण्याला सर्वोच्च प्राथमिकता देण्याचे आश्वासन दिले. त्या म्हणाल्या, "महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्यासाठी आम्ही बचत गटांच्या माध्यमातून घरबसल्या रोजगार उपलब्ध करून देण्यावर भर देणार आहोत. आजवर केलेल्या कामाची पावती म्हणून मतदार आमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत.

### बालेकिल्ल्यात भगवा फडकणारच

नवी सांगवी हा शिवसेनेचा पारंपरिक बालेकिल्ला राहिला आहे. ज्येष्ठ नागरिकांचे आशीर्वाद आणि तरुणाईचा जोश यामुळे प्रचारादरम्यान मोठा उत्साह दिसून येत आहे. प्रशांत बबनराव कडलग आणि मेघराजराजे सिध्दार्थ लोखंडे यांनीही स्थानिक प्रश्नांवर आपली ठाम भूमिका मांडली असून, विकासाभिमुख दृष्टिकोन आणि थेट जनसंवाद यावर त्यांनी भर दिला आहे. "आप्पांच्या शिलेदारांनी" यावेळी प्रभाग ३१ मध्ये भगवा फडकवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. शिवसेना (धनुष्यबाण) पॅनेलचे उमेदवार (अ) मनिषा आश्विन खुडे (अनुसूचित जाती) (ब) प्रशांत बबनराव कडलग (नागरिकांचा मागासवर्ग) (क) आरती संभाजी भेगडे (सर्वसाधारण महिला) (ड) मेघराजराजे सिध्दार्थ लोखंडे (सर्वसाधारण)

### मतदारांना आवाहन

उमेदवारांनी मतदारांना आवाहन केले आहे की, प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि विश्वासासाठी गुरुवार, दि. १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७:३० ते सायंकाळी ५:३० या वेळेत 'धनुष्यबाण' या चिन्हासमोरील बटन दाबून शिवसेनेच्या उमेदवारांना विजयी करावे. बचत गटांच्या माध्यमातून महिलांना रोजगाराचे आश्वासन. स्थानिक समस्या सोडवण्यासाठी ठोस कृती आराखडा. प्रचारात तरुणांचा आणि महिलांचा अभूतपूर्व सहभाग.

# श्रुती राम वाकडकर यांचा सोसायटीधारकांशी झंझावाती गाठी-भेटींचा दौरा

## वाकड–ताथवडे–पुनावळेत नागरिकांच्या प्रश्नांना थेट भिडणारा संवाद

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**वाकड, ता. ३ : प्रभाग क्रमांक २५ (क) मधील वाकड, ताथवडे व पुनावळे परिसरात सौ. श्रुती राम वाकडकर यांनी गेल्या काही दिवसांत केलेला सोसायटीधारकांशी थेट संवादाचा झंझावाती दौरा नागरिकांच्या मनाला भावून गेला आहे. कोणतीही औपचारिकता न ठेवता, थेट घराघरांत जाऊन समस्या ऐकून घेणारी, नोट्स काढणारी आणि उपायांची ठोस दिशा देणारी ही भेट नागरिकांसाठी दिलासादायक ठरली आहे..**



या गाठी-भेटींमध्ये श्रुती वाकडकर यांनी मोठे व्यासपीठ न निवडता सोसायटी परिसर, पार्किंग, गार्डन आणि प्रवेशद्वार हेच आपले संवादस्थळ केले. त्यामुळे हा दौरा केवळ प्रचारापुरता मर्यादित न राहता लोकांच्या दैनंदिन जीवनाशी जोडला आहे सोसायटीधारकांनी पाणीटंचाई, पार्किंगचा प्रश्न, वाहतूक कोंडी, अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था, ड्रेनेज, कचरा व्यवस्थापन, स्ट्रीट लाईट, सुरक्षेचे प्रश्न तसेच मुलांसाठी प्ले ग्राउंड व ज्येष्ठांसाठी विरंगुळा केंद्र यासारख्या अनेक समस्या मांडल्या. यावेळी श्रुती वाकडकर यांनी प्रत्येक प्रश्न शांतपणे ऐकून घेत “फक्त आश्वासन नाही, तर नियोजनासह उपाय” याबाबत भूमिका स्पष्ट केली.

विशेषतः N.H. 4 ग्रेड सेपरेटर, पी.सी.एम.सी. हॉस्पिटल, सिटी बस डेपो, ऑक्सिजन पार्क, सार्वजनिक वाचनालय आणि शाश्वत पाणी व्यवस्था या मुद्द्यांवर त्यांनी सविस्तर माहिती देत, या प्रकल्पांचा नागरिकांच्या जीवनावर होणारा सकारात्मक परिणाम समजावून सांगितला. “विकास म्हणजे फक्त इमारती नाहीत, तर सुरक्षित, आरोग्यदायी आणि सुसंस्कृत जीवन,” असे त्या प्रत्येक भेटीत ठामपणे सांगत होत्या.

### विकासाची दिशा दाखवणारा लोकसंवाद

गाठी-भेटी संपल्यानंतरही अनेक सोसायट्यांमध्ये श्रुती वाकडकर यांच्या साधेपणा, आपुलकी आणि स्पष्ट भूमिकेची चर्चा रंगताना दिसत आहे. एकंदरीत, हा दौरा म्हणजे केवळ राजकीय भेटींची मालिका नसून विश्वास निर्माण करणारा, आशा जागवणारा आणि विकासाची दिशा दाखवणारा लोकसंवाद ठरल्याचे चित्र परिसरात दिसून येत आहे

या दौऱ्याचे वैशिष्ट्य म्हणजे महिलांशी आणि ज्येष्ठ नागरिकांशी साधलेला हृदयस्पर्शी संवाद. अनेक महिलांनी सुरक्षितता, आरोग्यसेवा आणि सार्वजनिक वाहतुकीबाबत चिंता व्यक्त केली असता, “तुमची भीती आणि प्रश्न माझेच आहेत,” असे सांगत श्रुती वाकडकर यांनी भावनिक शब्दांत विश्वास दिला. काही ज्येष्ठ नागरिकांनी तर “नेते घरात येऊन प्रश्न विचारतात, हे पहिल्यांदाच पाहतोय,” अशा प्रतिक्रिया दिल्या.

आमदार शंकरभाऊ जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली आणि राम हनुमंत वाकडकर यांच्या नियोजनातून प्रभागाचा सुस्पष्ट विकास आराखडा तयार असल्याचे त्यांनी नागरिकांना सांगितले. “हा आराखडा फाईलमध्ये न राहता जमिनीवर उतरवण्याची जबाबदारी माझी आहे,” असे ठाम शब्द त्यांनी उच्चारले. या झंझावाती दौऱ्यामुळे प्रभाग २५ (क) मध्ये नवे, संवेदनशील आणि कार्यक्षम नेतृत्व उभे राहत असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.